सत्यमेव जयते

# भारतीय संविधान

## गौरवशाली अमृतमहोत्सवी वाटचाल...

मुख्यमंत्री **श्री. देवेंद्र फडणवीस** यांनी
भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल
दिनांक २६ मार्च २०२५ रोजी
**महाराष्ट्र विधानसभेत केलेले भाषण**



सत्यमेव जयते

# भारताचे संविधान

## गौरवशाली अमृतमहोत्सवी वाटचाल...

### मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी महाराष्ट्र विधानसभेत केलेले भाषण

संकलन आणि संपादन :
महाराष्ट्र विधीमंडळ संचालित
वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र
विधान भवन, मुंबई/नागपूर

| | | |
|---|---|---|
| प्रकाशक व मुद्रक | : | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,<br>विधान भवन, मुंबई ४०० ०३२. |
| मुखपृष्ठ, मांडणी व सजावट | : | शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,<br>चर्नी रोड, मुंबई ४०० ००४. |
| मुद्रण | : | शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,<br>चर्नी रोड मुंबई ४०० ००४. |

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

सत्यमेव जयते

# मार्गदर्शन आणि प्रेरणा



आचार्य देवव्रत
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य



प्रा. राम शिंदे
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद



ॲड. राहुल नार्वेकर
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा



श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



श्री. एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



श्री. अजित पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



डॉ. नीलम गोऱ्हे
उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद



श्री. अण्णा बनसोडे
उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा



श्री. चंद्रकांत (दादा) पाटील
संसदीय कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

# भारताचे संविधान

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक
सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही
गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वतःप्रत अर्पण करत आहोत.

आचार्य देवव्रत
Acharya Devvrat

राज भवन,
मलबार हिल, मुंबइ ४०००३५
RAJ BHAVAN,
Malabar Hill, Mumbai 400 035

सत्यमेव जयते

राज्यपाल, महाराष्ट्र
GOVERNOR OF MAHARASHTRA



12 नोव्हेंबर २०२५

# शुभेच्छा

महाराष्ट्र विधानमंडळाच्या वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी 'भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या विषयावर दिनांक २६ मार्च २०२५ रोजी केलेले अभ्यासपूर्ण भाषण पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याचे ठरवले असल्याचे समजून अतिशय आनंद झाला.

श्री देवेंद्र फडणवीस राज्याच्या संसदीय इतिहासातील एक अतिशय प्रभावी, लोकप्रिय व अभ्यासू व्यक्तिमत्व आहे. आपल्या राज्य विधानमंडळातील रौप्य महोत्सवी वाटचालीमध्ये त्यांनी अनेक पदे भूषविली आहेत. द्रष्टे मुख्यमंत्री म्हणून त्यांना देशभरात ओळखले जाते. श्री देवेंद्र फडणवीस अभ्यासू वक्ते असून त्यांनी आपल्या सभागृहातील व सभागृहाबाहेरील भाषणांमधून चर्चांचा स्तर उंचावताना सामान्य जनतेचे प्रबोधन केले आहे. "भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल" या विषयावरील त्यांचे भाषण हे भारतीय संविधान, केंद्र - राज्य संबंध, नागरिक शास्त्र, राज्यशास्त्र, राजकारण व समाजकारण या विषयांचा सुंदर मिलाफ असलेले प्रबोधन असून ते भावी पिढ्यांकरिता निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल असे आहे.

सदर भाषण पुस्तक रुपाने प्रकाशित करीत असल्याबद्दल मी महाराष्ट्र विधानमंडळाच्या वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे अभिनंदन करतो व प्रकाशन सोहळ्याला आपल्या शुभेच्छा देतो.

(आचार्य देवव्रत)
राज्यपाल, महाराष्ट्र व गुजरात



# प्रस्तावना



आपली राज्यघटना... आपले विचारवैभव...

दिनांक : १२ नोव्हेंबर, २०२५

विधानभवन, मुंबई.

सुदृढ आणि संवेदनशील संसदीय लोकशाहीला विद्वतजनांची चर्चा, सखोल विचारमंथन यांचे नेहमीच आकर्षण असते. 'वादे वादे जायते तत्वबोधः' हे सुभाषित संसदीय चर्चासत्रांना चपखल लागू होते. महाराष्ट्र विधानमंडळाने आपल्या दैदीप्यमान वाटचालीत सभागृहामधील विद्वत्तापूर्ण चर्चेचे असे विचारवैभव जपले आणि वृध्दींगत केले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन माहे मार्च, २०२५ मध्ये विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहात 'भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृतमहोत्सवी वाटचाल' या विषयावर, भारतीयांच्या वतीने भारताची राज्यघटना स्वीकारण्यात आल्याच्या ऐतिहासिक प्रसंगाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून, झालेली ही चर्चा सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांच्या अभ्यासपूर्ण सहभागामुळे अतिशय परिणामकारक आणि मार्गदर्शक ठरली. माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचे या चर्चेच्या उत्तरादाखल झालेले भाषण म्हणजे या विद्वतचर्चेचा कळसाध्याय ठरले.

नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व असा त्रिवेणी गुणसमुच्चय असलेल्या माननीय मुख्यमंत्री महोदयांचे दि. २६ मार्च, २०२५ रोजीचे हे भारतीय राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वाटचालीचा मागोवा घेणारे भाषण सर्वार्थाने वैशिष्टयपूर्ण झाले आहे आणि त्यामुळेच ते सर्वपक्षीय सन्माननीय सदस्य, राज्यशास्त्राचे अभ्यासक आणि पत्रकार मित्र अशा सर्वांकडून गौरविण्यात आले असून या उत्कृष्ट भाषणाची मुद्रित प्रत पुस्तिका स्वरुपातील सादरीकरण आपल्या हाती ठेवताना पीठासीन अधिकारी म्हणून आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

यापूर्वीदेखील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त नागपूर हिवाळी अधिवेशनात दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी त्यांच्या अभिवादनाचा प्रस्ताव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात माननीय पीठासीन अधिकारी यांच्यातर्फे मांडण्यात आला. तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्यासह सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांनी या विषयावर आपले अतिशय मूलगामी चिंतन आणि विचार सभागृहात व्यक्त केले, ज्यायोगे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेरणादायी जीवनचरित्र आणि भारतीय राज्यघटनेचे महत्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले. महाराष्ट्र विधिमंडळातील अशा महत्वाच्या विषयांवरील चर्चा, ठराव, प्रस्ताव याप्रसंगी पक्षीय मतभेदांच्या सीमा ओलांडून संसदीय लोकशाहीच्या बलस्थानांविषयी व्यक्त केली जाणारी आपुलकी, विश्वास आणि अपेक्षा आपल्या सर्वांसाठी नवी ऊर्जा प्रदान करणारी ठरते. संसदीय लोकशाहीच्या बलस्थानांविषयी तसेच लोकहिताच्यादृष्टीने सभागृहात उपस्थित होणाऱ्या मुद्यांबाबत अशी सर्वसहमती वेळोवेळी निर्माण होणे, हे आपल्या विधिमंडळाच्या कामकाजातील तेजोकण आहेत, जे जपून ठेवले पाहिजेत, ज्यांना वारंवार उजाळा दिला पाहिजे...

भारतीय राज्यघटना आणि भारतीयांनी ही राज्यघटना स्वीकारल्यानंतर भारतीय लोकशाहीने केलेली आजपर्यंतची अमृतमहोत्सवी वाटचाल, या विषयाचा आवाका अत्यंत विस्तृत आहे. समस्त भारतीयांना स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय याची ग्वाही देत सर्वसमावेशी विकासाच्या मार्गावरील मोठा टप्पा पार करीत आपल्या राज्यघटनेने पूर्ण केलेला गत ७५ वर्षांचा हा प्रवास खडतर परंतु उल्लेखनीय आहे. अनेक कठीण प्रसंग आणि खाचगळगे यावर मात करत जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या भारताने गाठलेला हा अमृतमहोत्सवी टप्पा अन्य देशांसाठी सुध्दा प्रेरणादायी ठरावा असा आहे. सन १९४७ च्या सुमारास भारतीय उपखंडात अन्य काही देश सुध्दा भारताबरोबरच स्वतंत्र झाले. परंतु अन्य देशाच्या तुलनेत बहुपक्षीय पध्दती असुनही भारताने संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून सर्वसमावेशी विकासाचा मार्ग दिनप्रतिदिन प्रशस्त केला आहे. भारतीय संस्कृती-सभ्यता, पारंपरिक ज्ञान आणि समताधिष्ठित समाजरचनेचा आधुनिक विचार यांचा सुंदर संगम आपल्याला भारतीय राज्यघटनेमध्ये दिसून येतो.

विविधतेत एकता हे सूत्र आपल्याला भारतीयत्वाच्या नात्याने आणखी मजबूत बनविते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दुरदृष्टी आणि सखोल ज्ञान याचे प्रत्यंतर राज्यघटनेचा अभ्यास आणि अनुसरण करताना पानोपानी जाणवते. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या दिनांक २६ मार्च, २०२५ रोजीच्या १ तास २० मिनिटांच्या भाषणात भारतीय राज्यघटनेची अशी ठळक वैशिष्टये एखाद्या चलचित्राप्रमाणे एकामागोमाग एक याप्रमाणे उलगडत जातात. भारतीय राज्यघटनेचे एक एक बलस्थान त्यांनी अनुरूप उदाहरणे देत, एखादा निष्णात रत्नपारखी ज्याप्रमाणे प्रकाश टाकत हिऱ्याचा एकेक पैलू दृग्गोचर करतो, त्याप्रमाणे सभागृहात सर्वांना दृश्यमान करुन दाखवले आहे.

भारताच्या राज्यघटनेची गौरवशाली अमृतमहोत्सवी वाटचाल बारकाईने समजून घेण्यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे हे भाषण दोन्ही सभागृहांच्या सन्माननीय सदस्यांबरोबरच संसदीय लोकशाहीवर निष्ठा असणाऱ्या प्रत्येकासाठी उद्बोधकच ठरणारे आहे. स्वतंत्र भारतातील घटनात्मक प्रक्रिया (Constitutional Process in India) सोप्या भाषेत समजावून घेण्यासाठी हे भाषण अत्यंत उपयोगी ठरणारे आहे.

भारतीय राज्यघटना आणि आरक्षणाची आवश्यक तरतूद समजावून घेण्यासाठी देखील माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण अतिशय महत्वाचे ठरणारे आहे. जोपर्यंत विषमता आहे तोपर्यंत विशेष तरतुदींचे लाभ द्यावेच लागतील. या तरतुदींसाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक असे चार निकष ठरविण्यात आले आहेत. संधीची समानता म्हणजे सर्वांना समान स्तरावर आणून मग स्पर्धा करणे आपल्या राज्यघटनेला अभिप्रेत आहे.

अमेरिका आणि भारत हे दोन देश जगाच्या पाठीवर असे आहेत की, ज्यांच्या राज्यघटनेला असा मोठा इतिहास लाभला आहे. भारतीय राज्यघटनेला ७५ वर्षे झाली असली तरी ती पुण्यपुरातन, नित्यनूतन, चिरतरूण आणि तितकीच प्रगल्भ आहे... माननीय मुख्यमंत्री महोदयांचे राज्यघटनेसंदर्भातील असे सुभाषितस्वरुप विचक्षण विवेचन आपण हे भाषण वाचतांना अनुभवू शकाल. आपल्या महाराष्ट्राला विधानकार्यामध्ये (Legislative Work) विशेष रस आणि आस्था असणारे माननीय मुख्यमंत्री लाभले आहेत. सन २०१४ मध्ये मुख्यमंत्रीपदी निवड

झाली त्यावेळीचे, "माझी विधानसभेतील कामगिरीच मला मुख्यमंत्री पदापर्यंत घेऊन आली", हे त्यांचे उद्‌गार पीठासीन अधिकारी या नात्याने आम्हाला फार महत्वाचे आणि मार्गदर्शक तर वाटतातच परंतु सर्व सन्माननीय सदस्यांना देखील संसदीय कामकाजातील सहभागासाठी प्रोत्सहान देणारे आहे. त्यामुळेच 'वक्ता दशसहस्त्रेषु' हे वचन सार्थ ठरविणाऱ्या राज्यप्रमुखांचे राज्यघटनेसंदर्भातील मार्गदर्शक विचार पुस्तिका स्वरुपात आम्ही प्रकाशित करीत आहोत. विधिमंडळाचे सन्माननीय आजी-माजी सदस्य, संपादक आणि पत्रकार मित्र, राज्यशास्त्राचे अभ्यासक, प्राध्यापक, सर्व राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि संसदीय लोकशाही पध्दतीविषयी आस्था बाळगणारे अशा सर्वांसाठी ही पुस्तिका चिरंतन प्रेरणा आणि ऊर्जेचा स्त्रोत ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. या पुस्तिकेचे संकलन आणि संपादन करण्यासाठी योगदान दिलेले वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि सर्व संबंधितांचे मनःपूर्वक आभार आणि अभिनंदन...

**ॲड. राहुल नार्वेकर**
अध्यक्ष
महाराष्ट्र विधानसभा

**प्रा. राम शिंदे**
सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद

# ॲड. राहुल सुरेश नार्वेकर



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र विधानसभा**
विधान भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :


**माननीय अध्यक्षांचे मनोगत...**

**सस्नेह नमस्कार,**

महाराष्ट्र विधानसभेला मोठी परंपरा आणि वारसा लाभलेला आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विधानसभेचे (Bombay Legislative Assembly) सदस्य म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळात (सन १९३७ ते १९४२) योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे या विधानसभेचे १९३७ ते १९४६ या काळात अध्यक्ष राहिलेले श्री. दादासाहेब मावळणकर हे राज्यघटना स्वीकारण्यात आल्यानंतर, सन १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीद्वारे गठीत झालेल्या, पहिल्या लोकसभेचे देखील १५ मे, १९५२ रोजी अध्यक्ष निवडले गेले. हे संदर्भ आपल्यासाठी अतिशय अभिमानाचे आणि गौरवाचे आहेत. व्यापक लोकहिताच्या विधेयकांवरील चर्चा, निर्णय, विविध संसदीय आयुधांद्वारे सभागृहात उपस्थित होणारे जनतेचे प्रश्न यावेळी पक्षीय मतमतांतरांच्या पलिकडे जाऊन व्यापक सहमती होणे, हे आपल्या सभागृहाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचे २६ मार्च, २०२५ रोजीचे भारतीय राज्यघटनेची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल अतिशय प्रभावीपणे अधोरेखित करणारे भाषण सभागृहात झाल्यानंतर हे भाषण पुस्तिका स्वरुपात प्रसिध्द करावे अशी मागणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य आणि माजी मंत्री श्री. भास्कर जाधव यांच्यासह दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी करावी हे याच परंपरेचे द्योतक आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष या नात्याने मी सभागृहातच या मागणीस सहर्ष अनुमती दिली. आज हे भाषण सुबक पुस्तिका स्वरुपात आपल्या हाती देताना मला आश्वासनपूर्तीचे समाधान आणि मनस्वी आनंद होत आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी... "मला या राज्यघटनेतून केवळ राजकीय लोकशाही नको आहे तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाही देखील या राज्यघटनेतून आली पाहिजे" असे म्हटले आहे, ज्याचा उल्लेख माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या भाषणात केला. सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी आपण सर्वांनी राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वर्षपूर्तीचे औचित्य साधून नव्या ऊर्जेने, नव्या प्रेरणेने कटिबध्द होणे आवश्यक आहे असे मला वाटते. पूर्व विधानसभा अध्यक्ष आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक आदरणीय श्री. बाळासाहेब भारदे यांनी विधानमंडळाला दिलेली "लोकशाहीचे मंदिर" ही उपमा आपण सभागृहातील आणि सभागृहाबाहेरील उल्लेखनीय योगदानाद्वारे सार्थ ठरवूया... त्या दृष्टीने आपल्या हाती देत असलेली ही ऊर्जस्वल पुस्तिका सर्वांना चिरंतन प्रेरणा देत राहिल, असा मला विश्वास वाटतो.

(ॲड. राहुल सुरेश नार्वेकर)


कार्यालय : ०२२-२२०२ ३१०१/ २२०२ ३५४२, फॅक्स : ०२२-२२०२ ४३२०
ई-मेल : speakerrsn1@gmail.com

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**एकनाथ संभाजी शिंदे**
**उप मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र**

0 3 DEC 2025



## शुभेच्छा

भारताचे संविधान म्हणजे केवळ कायद्यांचे संकलन नव्हे, तर आपल्या राष्ट्राची आत्मा, आपल्या लोकशाहीची पायाभरणी आणि सर्वसमावेशक भारताची शपथ आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कठीण काळात देशाच्या प्रत्येक घटकाची स्वप्ने, मूल्ये आणि आकांक्षा एकत्र गुंफून आमच्या संविधानकर्त्यांनी घडवलेला हा दस्तऐवज आज जगातील सर्वात बळकट, प्रगत आणि लोकसहभाग वाढवणारा म्हणून ओळखला जातो.

संविधानाच्या अमृत महोत्सवी वाटचालीच्या निमित्ताने महाराष्ट्र विधानमंडळाने प्रकाशित केलेली ही पुस्तिका म्हणजे आपल्या संविधानाच्या प्रवासाचे आत्मीय, अभ्यासू आणि प्रेरक प्रतिबिंब आहे. आपल्या राज्याच्या विधायी परंपरेने या ७५ वर्षांत लोकशाहीच्या प्रत्येक स्तरावर दृढता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांच्या मूल्यांना सातत्याने बळ दिले आहे.

संविधानाने दिलेले न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे चार स्तंभ आजही आपल्या विकासमार्गाला दिशा देत आहेत. 'जनता हीच खरी मालिक' या तत्त्वाला बळ देत महाराष्ट्राने सामाजिक न्याय, ग्रामीण आणि शहरी विकास, औद्योगिक प्रगती, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि कल्याण या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यामागे संविधानाने दिलेला मार्गदर्शक प्रकाशच आहे.

आजचा भारत हा गतिमान, आत्मनिर्भर, तंत्रज्ञानसमृद्ध आणि जगाला दिशा देणारा भारत आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी संविधानिक मूल्यांना कटाक्षाने धरून ठेवणारा प्रत्येक भारतीय आहे. लोकशाहीवरील अढळ विश्वास, विविधतेतील एकता आणि प्रगतीचा निर्धार हाच आपल्या राष्ट्रशक्तीचा आधारस्तंभ आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या या प्रकाशनातून संविधानिक मूल्यांची ओळख अधिक व्यापक समाजापर्यंत पोहोचेल, नवे संशोधक व विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल आणि लोकशाहीची कास धरून पुढे जाण्यासाठी एक भक्कम बौद्धिक भांडार उपलब्ध होईल, असा मला विश्वास आहे.

अमृत महोत्सवी भारताच्या दिशेने वाटचाल करताना आपण सर्वांनी संविधानिक कर्तव्यांची जाणीव ठेवून भारताला अधिक सक्षम, समृद्ध आणि समतोल बनवण्याचा संकल्प करूया.

जय हिंद!
जय महाराष्ट्र!

**(एकनाथ संभाजी शिंदे)**

**कार्यालय** : ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, **दूरध्वनी** : ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०१
**ई-मेल** : dcm@maharashtra.gov.in, **संकेत स्थळ** : www.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते



# उप मुख्यमंत्री
## महाराष्ट्र राज्य

दि. ७ नोव्हेंबर २०२५

**शुभेच्छा**

भारतीय गणराज्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त 'भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या विषयावर विधानमंडळात झालेल्या विशेष चर्चेतील मा. मुख्यमंत्री महोदयांचे भाषण ही लोकशाहीची आणि संसदीय परंपरेची उज्ज्वल साक्ष आहे. या भाषणाचा समावेश असणारी पुस्तिका महाराष्ट्र विधानमंडळाच्या वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित करण्यात येणार असल्याचे समजून आनंद झाला.

भारतीय राज्यघटना ही आपल्या राष्ट्रजीवनाची दिशा ठरवणारी आणि जनतेच्या आशा-आकांक्षांचे मूर्त रूप आहे. या संविधानाने समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांच्या आधारे समाजातील सर्व घटकांना एकत्र बांधले आहे. राज्यघटनेतील प्रत्येक कलम हे भारतीय लोकशाहीच्या स्थैर्याचे व सशक्ततेचे प्रतीक आहे. महाराष्ट्र विधानमंडळाने या अमृत महोत्सवी पर्वावर राज्यघटनेच्या गौरवशाली प्रवासाचा लेखाजोखा समाजापुढे ठेवण्याचा घेतलेला उपक्रम अत्यंत प्रशंसनीय आहे. या पुस्तिकेद्वारे नागरिकांमध्ये संविधानाविषयी अधिक जाण, अभिमान आणि जबाबदारीची भावना रुजविण्याचे कार्य निश्चितच घडेल.

या पुस्तिकेच्या प्रकाशनानिमित्त मी महाराष्ट्र विधानमंडळाच्या वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि या उपक्रमाला शुभेच्छा देतो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !**

**(अजित पवार)**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मंत्री
महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण,
संसदीय कार्य

**चंद्रकांत (दादा) पाटील**
कार्यालय : ३०२, मंत्रालय (विस्तार) इमारत,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
✉ : cbpatil.minister@gmail.com
☎ + 91 22 2202 4751 / 2202 5398



दि.१७ नोव्हेंबर, २०२५

## :: शुभसंदेश ::

भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त-भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल या ऐतिहासिक पर्वानिमित्त महाराष्ट्र विधिमंडळ वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या पुढाकारातून ही पुस्तिका प्रकाशित होत आहे, ही लोकशाहीचा सन्मान उंचावणारी बाब आहे.

दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी सभागृहात भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली. यावर सभागृहात संविधानिक मूल्यांवर चर्चा झाली.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सभागृहामध्ये संविधानाचे मूलभूत तत्त्व, राष्ट्रहिताचे शाश्वत अधिष्ठान, लोकशाहीची आत्मा आणि तत्त्वे, नागरिकांचे हक्क व कर्तव्ये, शासनव्यवस्थेतील समतोल या विषयांवर केलेली मांडणी सभागृहाला दिशादर्शक आहे.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या भाषणातील राष्ट्रनिष्ठा, लोकशाहीबद्दलची बांधिलकी या विषयांचे संकलन करून प्रकाशित होत असलेली ही पुस्तिका निश्चितच लोकशाही परंपरेचा गौरव वाढवणारी, सभागृहातील प्रत्येक सदस्यांना आणि पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणारी असेल.

प्रकाशित होणाऱ्या या पुस्तिकेस माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

C. B. Patil

(चंद्रकांत (दादा) पाटील)

## भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृतमहोत्सवी वाटचाल...

**श्री. देवेंद्र फडणवीस**

**मा. मुख्यमंत्री**

**२६ मार्च, २०२५**

अध्यक्ष महोदय, भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त "भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल" या विषयावर मागील दोन दिवसांपासून या सभागृहात चर्चा सुरू आहे. या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला आहे.

अध्यक्ष महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने अनेक सन्माननीय सदस्यांनी संविधानाच्या निर्मितीबद्दल, त्याच्या प्रक्रियेबद्दल, संविधानातील तरतुदींबद्दल अशा वेगवेगळ्या मुद्यांवर चर्चा केली आहे. या चर्चेच्या निमित्ताने काही चांगल्या गोष्टी देखील सांगितल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, माझ्या मते भारताचे संविधान हे जगातील सर्वात चांगले संविधान आहे. या संविधानामुळेच आपल्याला आज भारताची प्रगती पाहायला मिळते आहे. भारत हा जगातील सर्वात मोठी पाचवी अर्थव्यवस्था असलेला देश झाला. लवकरच जगातील सर्वात मोठी तिसरी अर्थव्यवस्था असलेला देश होईल. आपल्याला सन २०४७ मध्ये विकसित भारत पाहायला मिळेल. हे सर्व शक्य झाले ते केवळ आणि केवळ भारताच्या संविधानामुळे आणि संविधानाने उभ्या केलेल्या व्यवस्थेमुळे. म्हणूनच या देशाचे प्रधानमंत्री माननीय श्री. नरेंद्र मोदी यांनी सन २०१४, २०१९ व २०२४ मध्ये पंतप्रधानपदाची शपथ घेण्यापूर्वी याच संविधानाची पूजा केली आणि सांगितले की, "मला गीता, बायबल, कुराण या धर्मग्रंथापेक्षा भारताचे सरकार चालवत असताना भारताची राज्यघटना ही अधिक महत्त्वाची आहे आणि या राज्यघटनेनुसारच मी या भारताचे सरकार चालवेन." म्हणून भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये मी भारतीय

संविधानाला नमन करतो, संविधान सभेला नमन करतो आणि या संविधान निर्माणामध्ये ज्यांचे सर्वाधिक योगदान आहे, ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शतशः नमन करतो.

अध्यक्ष महोदय, या संविधानाने सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्रांती आणली. हे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केले असल्यामुळे ही रक्तविरहित क्रांती झाली. या संविधानामुळे एक मोठे परिवर्तन आपल्याला पाहायला मिळाले आहे. म्हणूनच मी या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, हे संविधान तयार करीत असताना उच्च भारतीय मूल्यांचा विचार केला गेला आणि त्यावर आधारित अशा प्रकारचे संविधान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केले.

अध्यक्ष महोदय, आपल्याला कल्पना आहे की, सन १९४६ मध्ये ज्यावेळी भारतीय स्वातंत्र्य चळवळ एका निर्णायक परिस्थितीमध्ये पोहोचली होती, तेव्हा इंग्रजांना लक्षात आले की, आता भारतीय ऐकण्याच्या मानसिकतेत नाहीत आणि आता आपण यांना सांभाळू देखील शकत नाही, अशा परिस्थितीमध्ये त्यांनी कॅबिनेट मिशन पाठविले.[१] या कॅबिनेट मिशनमध्ये लॉर्ड पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स आणि ए. व्ही. अलेक्झांडर असे एकूण तीन मंत्री होते. या कॅबिनेट मिशनने येथे येऊन एक रिपोर्ट दिला आणि निर्णय घेतला की, भारताला स्वतंत्र करायचे असेल तर स्वतंत्र भारताचे संविधान तयार करावे लागेल. त्यामुळे त्यांनी भारतीय नेतृत्वाशी चर्चा करून ‘संविधान सभा’ निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यापूर्वी गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ हा कायदा म्हणजे एक प्रकारचे संविधानच होते.[२] पण ते संविधान इंग्रजी राज्य चालविण्यासाठी भारतीयांचा सहभाग असला पाहिजे, अशा हेतूने तयार केलेले होते. हेच संविधान नंतर आपण संविधानामध्ये परिवर्तित केले, असे अनेक लोक म्हणतात. पण हे सत्य नाही. आपण जर बघितले तर आपल्या लक्षात येईल की, संविधान सभेने काळजीपूर्वक एकेका आर्टिकलवर दिवस-दिवस चर्चा केली

आहे. त्यानंतर त्याला स्वीकारलेले आहे. अतिशय बारीक-बारीक गोष्टींचा विचार करून तयार केलेले हे संविधान आहे. या संविधान सभेने[३] आपले कामकाज १६५ दिवस आणि ११ अधिवेशनात पूर्ण केले. संविधान सभेची पहिली बैठक दिनांक ९ डिसेंबर, १९४६ रोजी झाली आणि शेवटची बैठक दिनांक २४ जानेवारी, १९५० रोजी झाली. दिनांक २६ नोव्हेंबर,१९४९ रोजी संविधान स्वीकारले आणि दिनांक २६ जानेवारी,१९५० रोजी भारताला संविधान लागू केले. या सर्व प्रक्रियेला जवळपास तीन वर्षाला काही दिवस कमी एवढा कालावधी लागला. जगाच्या पाठीवर जेवढी संविधाने आहेत त्या सर्व संविधानांमध्ये सर्वाधिक प्रदीर्घ काळ या संविधान सभेने काम केलेले आहे. संविधान सभेमध्ये ३८९ सदस्य होते. त्यातील २९२ सदस्य हे प्रांतीय विधानसभांमधून निवडून आले होते. ९३ सदस्य हे संस्थानिकांचे होते आणि ४ जण हे मुख्य आयुक्त (Chief Commissioner) नावाच्या मतदारसंघामधून निवडून आले होते. आपल्याला कल्पना आहे की, पाकिस्तान स्वतंत्र झाल्यानंतर तर पाकिस्तानची संविधान सभा वेगळी आणि आपली संविधान सभा वेगळी झाली. खरं म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पहिल्यांदा या संविधान सभेकरता मुंबईतून निवडणूक लढले होते. त्यांना निवडून येऊ दिलं गेलं नाही. तेव्हा भारत अखंड होता. त्या ठिकाणी मंडल नावाचे एक निवडून आलेले प्रतिनिधी होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकरिता आपली जागा रिकामी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवडणूक लढले आणि तेथून निवडूनही आले. परंतु दुर्दैवाने ती असेम्ब्ली बांगलादेशमध्ये गेली म्हणून त्यांना ती सोडावी लागली. पुन्हा इकडे येऊन त्यांना नामनिर्देशन पद्धतीने संविधान सभेमध्ये जावे लागले. हा इतिहास देखील आपण बघितलेला आहे.

अध्यक्ष महोदय, दिनांक ९ डिसेंबर १९४६ ला जेव्हा संविधान सभेचे पहिले अधिवेशन झाले तेव्हा त्या पहिल्या अधिवेशनाची सुरुवात 'वंदे मातरम' या गीतानेच झाली. त्यामुळे आपल्याकडे असणारी ही पद्धत संविधान सभेपासूनची

आहे. आचार्य कृपलानी यांनी संविधान सभेमध्ये पहिले भाषण केले होते. या संविधान सभेने एक मसुदा लेखन समिती म्हणजे ड्राफ्टिंग कमिटी तयार केली.[४] या समितीचे अध्यक्ष पद हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे आले. या समितीने दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८ रोजी अंतिम मसुदा सादर केला. आपल्याला कल्पना आहे की, या कमिटीमध्ये सात सदस्य होते. त्यापैकी कोणी राजीनामा दिला, कोणी निधन पावले, कोणी आजारी पडले, कोणी बाहेर गेले. त्यामुळे प्रॅक्टिकली आपण जर विचार केला तर एकट्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हा बहुतांश ड्राफ्ट तयार करुन तो संविधान सभेपुढे मांडलेला आहे. त्यामुळे आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणतो. संविधान सभा तर ३०० लोकांची होती. पण त्या संविधान सभेतील सर्वात महत्त्वाचे ड्राफ्टिंगचे काम ड्राफ्टिंग कमिटीचे चेअरमन म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले, ते अद्वितीय आहे.

अध्यक्ष महोदय, 'माझी आत्मकथा' या आत्मचरित्रामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "घटना सभेत शिरतेवेळी अस्पृश्य समाजाच्या हितसंबंध रक्षणाच्या पलीकडे कोणताही दुसरा हेतू माझ्या मनात नव्हता. घटना सभेतील अत्यंत महत्त्वाचे कार्य करण्यासाठी माझी निवड करण्यात येईल याची मला चुकून देखील कल्पना नव्हती. मसुदा समितीत मला घेण्यात आले तेव्हा आश्चर्य वाटले. पण मसुदा समितीचे अध्यक्ष पद जेव्हा मिळाले तेव्हा माझ्या आश्चर्याचा कळस झाला. देशाची सेवा करण्याची संधी मला मिळाली त्याबद्दल मी आभार व्यक्त करतो." आपण जर संपूर्ण संविधान बघितले तर लक्षात येईल की, वंचितांचे हक्क अबाधित ठेवण्याकरता आलेल्या बाबासाहेबांनी या संविधानात केवळ वंचितांचा विचार केला नाही, तर भारतातल्या प्रत्येक व्यक्तीचा, जातीचा, धर्माचा, भाषेचा, संस्काराचा, संस्कृतीचा विचार केला म्हणून एक अत्यंत सर्वसमावेशक अशा प्रकारचे हे संविधान आपल्याला बाबासाहेबांच्या माध्यमातून मिळाले.

अध्यक्ष महोदय, सन १९४९ साली आपल्याला मिळालेले संविधान आपण सन १९५० साली लागू केले. त्यामध्ये सुरूवातीच्या काळात संविधानाची उद्देशिका होती. त्या उद्देशिकेमध्ये आपल्याला माहिती आहे की नंतर बरेच बदल झाले. संविधानात २२ भाग, ३९५ अनुच्छेद आणि ८ अनुसूची होत्या. आता यामध्ये बदल होऊन २५ भाग, ४४८ अनुच्छेद आणि १२ अनुसूची झालेल्या आहेत. मसुद्याच्या वेळी संविधानामध्ये सर्वांनी मिळून जवळपास ७,६३५ सुधारणा सुचविल्या होत्या. त्यापैकी २,४७३ सुधारणा टेबल होऊन स्वीकारण्यात आल्या.

अध्यक्ष महोदय, संविधान तयार झाल्यानंतर त्यात १०६ सुधारणा करण्यात आल्या आहेत. वेगवेगळ्या वेळी या सुधारणा झाल्या आहेत. यामध्ये अलीकडच्या काळात झालेल्या काही महत्त्वाच्या सुधारणा मी सांगतो. त्यात १०१ वी सुधारणा ही जीएसटी ची आहे, १०२ वी सुधारणा ओबीसी आयोगाला संवैधानिक दर्जा देण्याची आहे, १०३ वी सुधारणा आर्थिक मागासवर्गास आरक्षणाची आहे, १०४ वी सुधारणा एससी एसटी करीता संसद आणि विधानसभेतील जागांना मुदतवाढ देण्याची आहे, १०५ वी सुधारणा ही ओबीसी ची यादी तयार करण्याचा अधिकार राज्यांना देण्याची आहे, १०६ वी सुधारणा महिलांना संसदेत आणि विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याची आहे. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या काळात झालेल्या या सर्व सुधारणा देशाला दिशा देणाऱ्या आहेत. भारतीय संविधानाचे जे हस्तलिखित तयार करण्यात आले त्यात जवळपास ९० हजार शब्द आहेत. प्रेमबिहारी नारायण रायजादा यांनी कॅलिग्राफीने ते लिहिलेले आहे. ही मूळ प्रत हस्तलिखित आहे. त्याकरिता त्यांना सहा महिने लागले. नंदलाल बोस यांनी त्याच्या सजावटीचे काम केले आहे. सिंधू घाटीपासून तर स्वातंत्र्याच्या चळवळीपर्यंतच्या आपल्या इतिहासाची आरेखने ही या संविधानावर रेखाटलेली आपल्याला पाहायला मिळतात.[५] संविधानाची ही मूळ प्रिंट हेलियम केसमध्ये आजही संसदेच्या लायब्ररीत ठेवण्यात आलेली आहे. गुलामगिरीची मानसिकता तोडून भारतीयत्व स्वीकारण्याकरता आपण हे संविधान स्वीकारले

आहे. ब्रिटिशांचा क्राऊन निघाला आणि त्याची जागा अशोक चक्राने घेतली हा महत्त्वाचा बदल या संविधानाने केला.

अध्यक्ष महोदय, भारतीय समाज हा वेगवेगळ्या संस्कृतींनी ओळखला जातो. विविधतेतील एकता हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे, ते वैशिष्ट्य अधोरेखित करणारे हे संविधान आज आपल्याला पाहायला मिळते. सन १९१६ मध्ये कोलंबिया विद्यापीठात एका Anthropology Seminar मध्ये बोलत असताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले "It is the unity of culture that is the basis of homogeneity. Taking this for granted, I venture to say that there is no country that can rival the Indian Peninsula with respect to the unity of its culture. It has not only a geographic unity, but it has over and above all a deeper and a much more fundamental unity, the indubitable cultural unity that covers the land from end to end."

अध्यक्ष महोदय, मला असे वाटते की, ही जी भारताची एक क्षमता होती, जी एक सांस्कृतिक एकता होती, तीच सांस्कृतिक एकता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचारात घेऊन त्याला राजकीय एकतेमध्ये कसे परिवर्तित करता येईल असा प्रयत्न या संविधानाच्या माध्यमातून केला आहे.

अध्यक्ष महोदय, या संविधानाची जी काही रचना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली आहे, त्यामध्ये आपले जे समृद्ध राष्ट्रीय जीवन आहे, त्या समृद्ध राष्ट्रीय जीवनाचे प्रतिबिंब उमटवीत असताना, या समृद्ध राष्ट्रीय जीवनाला ज्या रुढी आणि परंपरा छेद देत होत्या, त्यांना संपविण्याचे काम देखील याच संविधानाच्या माध्यमातून त्यांनी केले. मला असे वाटते की, त्यामुळेच आपल्याला या संविधानामध्ये सगळ्या गोष्टी पाहायला मिळतात. धर्मनिरपेक्षताही पाहायला मिळते आणि त्याच वेळी धार्मिक रितीरिवाजांचे संरक्षणही यामध्ये आपल्याला

पाहायला मिळते. या संविधानामध्ये शाश्वत भारताचा आत्मा देखील आपल्याला पाहायला मिळतो आणि पर्यावरणाच्या प्रती शाश्वत दृष्टिकोन देखील याच संविधानामध्ये आपल्याला पाहायला मिळतो. मानवी जीवनाच्या मुक्तीचा जो काही क्षण आहे तिथपर्यंत मानवी जीवनात ज्या-ज्या गोष्टी घडतात त्या प्रत्येक गोष्टीला डिग्निटी मिळाली पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न करणारे हे संविधान आपल्याला पाहायला मिळते.

अध्यक्ष महोदय, खरे तर आपल्याला याची कल्पना आहे की, भारत हा सांस्कृतिकदृष्ट्या नेहमी एक राहिलेला आहे. आपण भारताचा इतिहास बघितला तर अनेक वेळा राजे बदलले. भारत स्वतंत्र झाला तेव्हा ५४२ वेगवेगळ्या प्रकारची संस्थाने होती. ही संस्थाने ही राजकीय व्यवस्था होती. ती सांस्कृतिक व्यवस्था नव्हती. सांस्कृतिक व्यवस्थेत दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत भारत नेहमीच एक राहिला.

अध्यक्ष महोदय, आपल्या संस्कृती, आपल्या प्रथा, परंपरा, ज्याला माननीय सर्वोच्च न्यायालयाने ‘Hindu way of life’ म्हटलेले आहे, सिंधू संस्कृती म्हटलेले आहे. भारतीय जीवन पद्धतीत, राजकीय नेते बदलले, राजकीय राजे बदलले, अनेक वेळा खंड- खंडामध्ये भारताचे राजकीय नेतृत्व गेले, परंतु समाज मात्र एक राहिला, त्यांच्या परंपरा एक राहिल्या, त्यांच्यातला पारस्परिक भाव एक राहिला. ही जी काही सांस्कृतिक एकता होती, ही सांस्कृतिक एकता ज्यावेळेस या देशावर राजकीय अशा प्रकारची व्यवस्था तयार करायची आहे, गव्हर्नन्स ची व्यवस्था तयार करायची आहे, त्यावेळी त्या गव्हर्नन्स मध्येही आपण एकसंघ कसे राहू शकू, याचा विचार करणारे अशा प्रकारचे हे संविधान आपल्याला पाहायला मिळते.

अध्यक्ष महोदय, यात सगळ्यात महत्त्वाचे काय असेल तर, ती या संविधानाची उद्देशिका आहे. ही उद्देशिका अगदी कमी शब्दांमध्ये भारताची नीती काय आहे, भारताचा विचार काय आहे, भारत कशा पद्धतीने चालला पाहिजे,

हे आपल्याला सांगते. ती उद्देशिका भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगत नाहीत. ही भारताची लोकसभा किंवा संसदही सांगत नाही. मग हे कोण सांगतेय तर उद्देशिका असे सांगते की, "आम्ही भारताचे लोक". ही उद्देशिका आपली आहे, भारताच्या लोकांची उद्देशिका आहे. "आम्ही भारताचे लोक भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक, राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा आणि संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता याचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून आमच्या संविधान सभेत दि.२६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करतो आहोत". ही जी सांविधानिक मूल्ये आहेत, ती आम्ही आमच्याकरिता ठरविली आहेत. आम्ही आम्हाला अर्पण केलेले आहे आणि म्हणून हे सांविधानिक मूल्य जोपासण्याची जबाबदारी आज आमची आहे, ही आपली जबाबदारी आहे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये कुठल्या व्हॅल्यूज आल्या आहेत हे पाहिले तर, यामध्ये पाश्चिमात्य राष्ट्रातल्या व्हॅल्यूज नाहीत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या संविधानामध्ये सर्वाधिक जोर कशावर दिला असेल तर, तो बंधुतेवर दिला आहे. ठिकठिकाणी 'बंधुता' म्हणजे 'Fraternity' हा शब्द आपल्याला पाहायला मिळतो. हे तत्वज्ञान कुठले आहे, हे भगवान गौतम बुद्धांचे तत्वज्ञान आहे. गौतम बुद्धांच्या तत्वज्ञानामध्ये जी बंधुता सांगितलेली आहे किंवा सनातन विचारामध्ये जे वसुधैव कुटुंबकम सांगितलेले आहे, तो विचार खऱ्या अर्थाने या संविधानामध्ये आपल्याला पाहायला मिळतो. यामुळेच त्यांनी सर्वाधिक महत्त्व बंधुतेला दिलेले आहे. त्याचवेळी न्याय, समानता, स्वातंत्र्य या सगळ्या गोष्टी, हा खरा आपल्या संविधानाचा पाया आहे. [६]

अध्यक्ष महोदय, प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा आणि सन्मान समानता म्हणजे काय तर संधीची समानता आहे. कुठल्याही व्यक्तीला जात, धर्म, पंथ याच्या

आधारावर संधी मिळणार नाही. संधीची समानता त्यांनी दिली आणि खऱ्या अर्थाने प्रत्येकाची डिग्निटी राहिली पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न या संविधानाच्या माध्यमातून त्यांनी केल्याचे आपल्याला पाहायला मिळते.

अध्यक्ष महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "मला या संविधानातून केवळ राजकीय लोकशाही नको आहे, तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाही देखील या संविधानातून आली पाहिजे. हे तत्व मी फ्रेंच चळवळीतून घेतलेले नाही, तर भगवान गौतम बुद्धांच्या तत्वज्ञानातून घेतले आहे", हे त्यांनी सांगितले.

अध्यक्ष महोदय, जसे मी आधी सांगितले की, नंदलाल बोस यांनी भारतीय संविधानाच्या मूळ हस्तलिखित प्रतीच्या सुशोभीकरणाचे काम केले. हे सुशोभीकरण कसे करण्यात आलेले आहे तर, भारतीय कला, भारतीय संस्कृती, भारतीय मूल्य सांगणारी आरेखने, महाभारत, रामायण, भगवान गौतम बुद्ध, भगवान महावीर, धम्मचक्र, छत्रपती शिवाजी महाराज हे सगळे आमच्या संविधानाच्या मूळ प्रतीमध्ये आढळतात.

अध्यक्ष महोदय, हे सगळे वापरत असताना त्याच्या पाठीमागचा हेतू काय आहे, तर केवळ सुशोभीकरण हा त्यामागचा उद्देश नाही तर, भारतीय संस्कृती आणि भारतीय पारंपरिक ज्ञान या दोन गोष्टींचा सन्मान करणारे हे संविधान आहे. हे कोणाकडून उचलेगिरी करून आणलेले नाही. यातील मूळ तत्व हे आमचे आहे. याच्यामध्ये शिंग असलेला बैल हे सिंधू संस्कृतीचे एक प्रकारचे दर्शन घडवतो. कारण त्यांचा सिम्बॉल शिंग असलेला बैल आहे. मोहंजोदाडोची आपली प्राचीन परंपरा याच्यामध्ये पाहायला मिळते. गुरुकुलची चित्रे ही एक संपन्न शैक्षणिक परंपरा या संविधानात दाखवते. लंकेतून सीतेची सुटका देखील या संविधानाच्या मूळ प्रतीमध्ये दाखवलेली आहे. ती याकरिता दाखवलेली आहे की, आम्हाला नारी सन्मानाकरिता या संविधानाचा वापर करायचा आहे, हे त्यात अभिप्रेत आहे.

अध्यक्ष महोदय, यात 'Directive Principles of State Policy' या शीर्षकाचे एक प्रकरण आहे. तिथे गीतोपदेश देखील याच संविधानात दाखविण्यात आलेला आहे. या तत्त्वांवर भारतीय संविधान उभे आहे. या संविधानाने आपल्याला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे लोकशाही. आपण रामराज्याची चर्चा करतो. महात्मा गांधी नेहमी म्हणायचे की, रामराज्य आणायचे आहे. समाजातील शेवटच्या व्यक्तीचेही राजा ऐकतो, राजा भेदभाव करत नाही, त्याला रामराज्य म्हणतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समानतेने जगवणारी व्यवस्था म्हणजे रामराज्य. समाजातील छोट्या लोकांना एकत्र करून त्यांच्यातील पौरुष जागृत करून त्यांना शक्ती देणारी व्यवस्था म्हणजे रामराज्य.

अध्यक्ष महोदय, अनेक लोक लोकशाही इकडून-तिकडून आली असे म्हणतात, पण ही लोकशाही मूळची भारतीय आहे. भारतात इतर कोणत्याही देशापेक्षा अगोदर लोकशाही होती. महात्मा बसवण्णांनी अनुभव मंटपा सुरू केला होता. ते लोकशाहीचे प्रतीक होते. पाटलीपुत्रातही त्या काळात गणराज्याच्या रूपात लोकशाही दिसते. म्हणूनच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही लोकशाही भारतात आणली. ते म्हणतात, "It is not that India did not know what Democracy is. There was a time when India was studded with republics, and even when there were monarchies, they were either elected or limited. They were never absolute. It is not that India did not know Parliaments or parliamentary procedures. A study of the Buddhist Bhikkhu Sanghas discloses that not only there were Parliaments—for the Sanghas were nothing but Parliaments—but the Sanghas knew and observed all the rules of parliamentary procedure known to

modern times. They had rules regarding seating arrangements, rules regarding Motions, Resolutions, Quorum, Whip, Counting of Votes, Voting by Ballot, Censure Motion, Regularisation, Res Judicata, etc. Although these rules of parliamentary procedures were applied by the Buddha to the meetings of the Sanghas, he must have borrowed them from the rules of the Political Assemblies functioning in our country at that time." त्यामुळे संविधानातील तत्त्वे ही भारतीयच आहेत. काही लोक सहज म्हणतात की हे संविधान १०-२० देशांच्या संविधानातून घेतलेले आहे, हे सत्य नाही. हे पूर्णपणे शुद्ध भारतीय तत्त्वांवर तयार केलेले संविधान आहे.

अध्यक्ष महोदय, संविधान सभेत भारताच्या ध्वजासंदर्भात चर्चा सुरू असताना राधाकृष्णन म्हणाले, "जोपर्यंत आपण सद्‌गुणांवर चालत नाही, तोपर्यंत पवित्रतेचे ध्येय किंवा सत्य गाठू शकत नाही. अशोक चक्र हे कायद्याचे चक्र आहे, धर्माचे चक्र आहे. सत्य गाठायचे असेल तर धर्माच्या मार्गानेच जावे लागेल. या ध्वजाखाली काम करणाऱ्याचे आचरण सत्य आणि धर्मावर आधारित असावे. धर्म हे सतत पुढे जाणारे गतिमान चक्र आहे." यापूर्वीच्या काळात आपल्याला बदलांना प्रतिकार केल्यामुळे त्रास सहन करावा लागला. काळाबरोबर चालण्याचे धैर्य आपण दाखवले नाही, तर मागे राहू. जोपर्यंत आपण जात, अस्पृश्यता त्यागणार नाही, तोपर्यंत सत्य आणि सद्‌गुणांचा वारसा सांगू शकणार नाही. हे चक्र आपल्याला सांगते की, एका ठिकाणी थांबणे म्हणजे मृत्यू, तर सतत फिरत राहणे म्हणजे जीवन. म्हणूनच आपण अशोक चक्र ध्वजावर स्वीकारले. ही भारतीय जीवनपद्धती संविधानाचा आत्मा आहे. या पद्धतीला स्थान दिल्यामुळेच अनेकांना ते खुपले.

अध्यक्ष महोदय, आपल्या अंतिम भाषणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषतः कम्युनिस्ट आणि समाजवादी पक्षांच्या संदर्भात म्हणाले की,

"कम्युनिस्ट पार्टी आणि समाजवादी पार्टी या दोन घटकांनी संविधानावर टीका केली. त्यांनी का टीका केली? संविधान खरोखर वाईट आहे म्हणून केली का? मी स्पष्टपणे सांगेन असे नाही. कम्युनिस्टांना संविधानातून हुकूमशाही हवी होती, पण हे संविधान संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करते, म्हणून ते टीका करतात. समाजवाद्यांना दोन गोष्टी हव्या होत्या. खाजगी मालमत्तेचे राष्ट्रीयकरण किंवा सामाजिकीकरण हवे होते, तेही नुकसानभरपाई शिवाय हवे होते, आणि मूलभूत अधिकार परिपूर्ण आणि मर्यादेशिवाय हवे होते. कारण त्यांचा पक्ष सत्तेत आला नाही, तर राज्य उलथवण्याचे स्वातंत्र्य त्यांना मिळेल म्हणून त्यांनी विरोध केला."

अध्यक्ष महोदय, आज हीच परिस्थिती आहे. देशाच्या सर्व संस्थांना कलंकित करणे, त्यांच्यावर बोट उचलणे, त्यांना अराजकतेकडे नेण्याचा प्रयत्न करणे सुरु आहे. सत्तेत येऊ शकत नाही, म्हणून संस्था बदनाम करण्यात येत आहेत. आपण जेव्हा या संस्था बदनाम करतो, तेव्हा संविधानावर अविश्वास दाखवतो. कारण या संविधानानेच त्या संस्था निर्माण केल्या आहेत. त्या इतक्या बळकट आहेत की कोणीही त्यांना तोडू किंवा मोडू शकत नाही. तसा प्रयत्न केला तरी ही संविधानाने त्या संस्थांना कोणाला हात लावू दिला नाही, त्यावर मी पुढे बोलणार आहे. कोणीही जन्माला आले तरी संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांचे वाकडे होऊ शकत नाही, हे लक्षात घ्यायला हवे.

अध्यक्ष महोदय, संविधानातील महत्त्वाच्या गोष्टी काय आहेत? भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मूलभूत हक्क सर्वाधिक प्रिय होते.[७] आपल्या भाषणात ते वारंवार याचा उल्लेख करतात. अनुच्छेद १४-कायद्यासमोर समानता, अनुच्छेद १५-धर्म, जात, लिंग किंवा जन्मस्थानावरून भेदभाव करता येणार नाही, अनुच्छेद १६-सार्वजनिक सेवा योजनांमध्ये समान संधी, अनुच्छेद १९-अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य. अनुच्छेद १५ मध्ये त्यांनी धर्म, जात, लिंग किंवा जन्मस्थानावरून भेदभाव निषिद्ध केला, पण अनुच्छेद १५(४) आणि १५(५) मध्ये त्यांनी सांगितले की, जर एखादा समाज मागास राहिला

असेल, तर त्याला पुढे आणण्यासाठी शैक्षणिक आरक्षणाची तरतूद करावी. याचे कारण काय? संविधानाने संधीची समानता दिली म्हणजे काय? वर्षानुवर्षे अन्याय झालेल्या, लाभ न मिळालेल्या लोकांना ज्यांना जन्मतःच सोन्याचा चमचा मिळाला आहे, त्यांच्यासमोर पहिल्याच दिवशी स्पर्धा करायला लावणे म्हणजे अन्यायकारक स्पर्धा. संधीची समानता म्हणजे सर्वांना समान स्तरावर आणून मग स्पर्धा करणे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'अफर्मेटिव्ह ॲक्शन' सांगितली. जोपर्यंत विषमता आहे, तोपर्यंत विशेष तरतुदींचे लाभ द्यावे लागतील. या तरतुदींसाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मागासलेपण असे ४ निकष ठरवले. यामध्ये पहिला नंबर कोणाला दिला ते आपण पाहूया. जे सामाजिकदृष्ट्या प्रताडित झालेले आहेत किंवा जे सामाजिकदृष्ट्या मागास राहिले आहेत, शैक्षणिकदृष्ट्या मागास राहिले आहेत, सांस्कृतिकदृष्ट्या मागास राहिले आहेत आणि जे आर्थिकदृष्ट्या मागास राहिले त्यांना म्हणजेच ज्यांना हे चारही मुद्दे लागू पडले, ते आमच्या देशातील अनुसूचित जातीचे लोक झाले, अनुसूचित जमातीचे लोक झाले आणि त्यांना पहिले आरक्षण मिळाले.

अध्यक्ष महोदय, त्यामुळेच तर एससी, एसटीचे आरक्षण, ओबीसीचे आरक्षण आणि ईडब्ल्यूएसचे आरक्षण यांचे निकष ठरवताना, मी आताच सांगितल्याप्रमाणे या चार टेस्टमध्ये जे क्वॉलिफाय झाले, त्यांनाच ते आरक्षण दिलेले आहे. अशाच प्रकारे आर्टिकल १६ च्या १६ (४) मध्ये हेच तत्व वापरून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नोकऱ्यांमधील आरक्षण दिले. हे आरक्षण देत असताना त्यांनी हे केलेले अपवाद परमनंट केले नाही. तर त्यांनी सांगितले की, ५० वर्षांकरिता हे आरक्षण आम्ही ठेवत आहोत. त्यावेळी त्यांना अशी अपेक्षा होती की, ५० वर्षांमध्ये हा देश आपली विषमता संपवू शकेल. परंतु दुर्दैवाने आमच्या समाज व्यवस्थेने ५० वर्षात विषमता संपवली नाही. त्यामुळे पहिल्यांदा आदरणीय माजी पंतप्रधान स्व. अटल बिहारी वाजपेयीजींच्या

सरकारमध्ये त्याला मुदतवाढ देण्यात आली. नंतर माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या सरकारमध्ये त्याला मुदतवाढ देण्यात आली आणि जोपर्यंत ही विषमता आहे, तोपर्यंत आम्ही संधीची समानता हे जे आमचे संवैधानिक मूल्य आहे, त्या मूल्यानुसार सगळे समान स्तरावर येऊ शकत नाहीत, तोपर्यंत हे आरक्षण कायमच ठेवावे लागेल हे देखील या निमित्ताने आपण सगळ्यांनी मान्य केलं पाहिजे.

अनुच्छेद १९ मध्ये अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले आहे. माझा एक मित्र परदेशात गेला आणि परदेशात गेल्यावर त्यांनी सांगितले की, आमच्याकडे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे व त्यामुळे आम्ही चौकात उभे राहून देशाच्या पंतप्रधानाबद्दल देखील बोलू शकतो. आमच्याकडे काही अडचण येत नाही. तेव्हा समोरच्या व्यक्तीने मित्राला अतिशय मजेशीर उत्तर दिले. तो असे म्हणाला "In our country we have total freedom of speech, but we do not guarantee freedom after speech".

मूलभूत हक्काच्या खालोखाल महत्त्वाचे जर काही संविधानात असेल तर ते Directive Principles of State Policy म्हणजेच राज्य धोरणांसाठीची निदेशक तत्वे हे आहे. राज्य धोरणाची अनेक मार्गदशक तत्वे आहेत.[८] पण सातत्याने टीका होते किंवा वेगवेगळे अर्थ काढले जातात. म्हणून दोनच निदेशक तत्वे मी या ठिकाणी सांगणार आहे. त्यातील पहिले तत्व समान नागरी कायदा म्हणजेच Uniform Civil Code हे आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'राज्य धोरणांची निदेशक तत्वे' च्या अनुच्छेद ४४ मध्ये प्रत्येक राज्यावर ही जबाबदारी टाकली आहे की, त्या राज्याने समान नागरी कायदा आणला पाहिजे. नागरिकांना भारताच्या राज्य क्षेत्रात सर्वत्र एकरूप, समान नागरी संहिता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील, हा समान नागरी कायदा आहे. दुसरे अनुच्छेद ४८ आहे. यामध्ये कृषी व पशुसंवर्धन याची सुसूत्र व्यवस्था लावणे, आधुनिक व शास्त्रीय रीतीने कृषी व पशुसंवर्धन

याची सुसूत्र व्यवस्था लावण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. विशेषतः गाई व वासरे, इतर दुभती जनावरे व जुंपण्याची गुरे यांच्या जातीचे जतन करणे व त्या सुधारणे तसेच त्यांच्या कत्तलीस मनाई करणे याकरिता उपाययोजना करणे हे आहे. आपण संपूर्ण गोवंश हत्याबंदीचा कायदा केला. हा कायदा करण्याचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या राज्याला किंवा प्रत्येक राज्याला तशा प्रकारचा डिरेक्टिव दिलेला आहे. ही आपली जबाबदारी आहे. एखाद्या राज्याने केला नसेल तर ती जबाबदारी त्या राज्याने पार पाडलेली नाही आणि म्हणून मला असे वाटते की, ज्यावेळेस याच्यावर टीका केली जाते, त्यावेळेस त्यांनी संविधानच वाचलेले नाही, हा अतिशय महत्त्वाचा विषय यामध्ये आपल्याला पाहायला मिळतो.

अध्यक्ष महोदय, अनेक बाबी आहेत. पण मी सगळ्या विषयांमध्ये जाणार नाही. एक महत्त्वाचे आयुध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दिले आणि ते म्हणजे रिट ज्युरिस्डीक्शन. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, जर या घटनेचा एखादा अनुच्छेद माझ्या हृदयाच्या जवळ असेल तर तो म्हणजे अनुच्छेद ३२ आहे व या अनुच्छेदान्वे कोणत्याही मूलभूत हक्काची पायमल्ली झाली तर कोणत्याही नागरिकाला थेट सुप्रीम कोर्टात किंवा हायकोर्टात दाद मागता येईल. रिट ज्युरिसडिक्शन ही एक अशी व्यवस्था उभी केली की, ज्याच्यामध्ये मूलभूत अधिकाराचे हनन झाले असेल तर खालचे न्यायालय, त्याच्यावरचे न्यायालय असे काही जाण्याची गरज नाही. थेट आर्टिकल ३२ ने सुप्रीम कोर्टात जाता येते आणि आर्टिकल २२६ ने हायकोर्टामध्ये रिट पिटिशन करता येते. त्यांनी रिट ज्युरिस्डिक्शन एक अशी व्यवस्था केली की, ज्या व्यवस्थेमुळे मूलभूत हक्कांची पायमल्ली झाली तर तात्काळ आपल्याला न्याय मिळवता येतो. आज आपण पाहतो की, हायकोर्टात आणि सुप्रीम कोर्टात जाण्याकरता याच रिट ज्युरिस्डिक्शन चा आपण सगळे उपयोग करतो. याचसोबत संविधानामध्ये मूलभूत कर्तव्य देखील सांगितलेली आहेत. अर्थात ती मूळ संविधानामध्ये नव्हती. ती मूलभूत कर्तव्य इमर्जन्सीच्या काळामध्ये अंतर्भूत केली. पण ती

टूथलेस आहेत. ती मूलभूत कर्तव्य पार पाडली नाही, तरी त्याला कुठला रिकोर्स नाही.

मुळातच या संविधानाने आपल्या देशामध्ये संघराज्य प्रणाली स्वीकारलेली आहे. आपण क्वाजी जुडिशियल फेडरेशन (Quasi judicial federation) आहोत. यामध्ये एक सेंट्रल गव्हर्नमेंट आहे, दुसरे स्टेट गव्हर्नमेंट आहे, पण आपल्या फेडरेशन मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलं की, आमची सांस्कृतिक एकता आहे. त्यामुळे रशियन फेडरेशन सारखी आमची शकले उडू शकत नाहीत. आमच्या कुठल्या राज्याला त्या ठिकाणी देशातून बाहेर निघण्याचा अधिकार नाही. राज्याला त्यांचे अधिकार आहेत. केंद्राला त्यांचे अधिकार आहेत. पण ते अधिकार असताना आम्ही  सगळे एकसंघ आहोत आणि म्हणून Unity and Integrity यावर त्यांनी अशा प्रकारचा अधिक भर दिला.

अध्यक्ष महोदय, ही रचना अतिशय सुंदर केली आहे. राष्ट्रपती हे देशाचे प्रमुख ठेवलेले आहेत. पण राष्ट्रपतींना सल्ला देण्याकरिता मंत्रिपरिषद तयार केलेली आहे. म्हणजे प्रधानमंत्री आणि मंत्रिपरिषद जो सल्ला देईल, त्या सल्ल्याप्रमाणे देशाचा कारभार राष्ट्रपती चालवतील. त्यामुळे देशाचा कारभार माननीय राष्ट्रपतींच्या नावाने चालतो, माननीय पंतप्रधानांच्या नाही. तसेच राज्याचा कारभार राज्यपालांच्या नावाने चालतो, मुख्यमंत्र्यांच्या नाही. अशा प्रकारची व्यवस्था आपल्या संविधानाने केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, एक्झिक्युटीव्ह म्हणजे कार्यपालिका ही मंत्रिपरिषद आहे. ते आपले आयएएस अधिकारी नाही. मंत्रिपरिषदेला कार्यपालिकेचा दर्जा आहे. न्यायपालिका, कार्यपालिका आणि अर्थातच संसद असून अशा प्रकारचे तीन स्तंभ तयार केले आणि चौथा अदृश्य स्तंभ आहे व तो संविधानात नाही. पण आमची माध्यमे हा चौथा स्तंभ अदृश्य आहे. हे तीन स्तंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या माध्यमातून तयार केले. याची रचना इतकी चांगली केलेली की, यामध्ये

'Doctrine of Separation of Power' वापरलेला आहे [१]. याचा अर्थ काय तर तिघांचेही पॉवर वेगळे केलेले आहेत. कार्यपालिकेचे पॉवर वेगळे आहेत, न्यायपालिकेचे वेगळे आहेत आणि आपल्या विधिपालिकेचे म्हणजे संसदेचे पॉवर्स वेगळे आहेत. पण यामध्ये चेक्स ॲन्ड बॅलन्सेस देखील ठेवलेले आहेत. त्यामुळे कोणीही या ठिकाणी अनिर्बंध होऊ शकत नाही. अशा प्रकारचा अंकुश तयार केलेला आहे. राज्यकारभार चालविण्याची जबाबदारी मंत्रिमंडळाची आहे. परंतु त्यावर अंकुश ठेवण्यासाठी संसद तयार करण्यात आलेली आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ निरंकुशपणे काम करू शकत नाही. त्यांना संसदेसमोर जाऊन मान्यता घेऊन कारभार करावा लागतो, मान्यता घेऊनच कायदे करावे लागतात आणि अर्थसंकल्पालाही मान्यता घ्यावी लागते. म्हणजे कार्यपालिकेवर विधिपालिकेचा अंकुश ठेवलेला आहे. विधिपालिकेने केलेला कायदा अयोग्य असेल तर तो असंवैधानिक ठरविण्याची शक्ती न्यायपालिकेला दिलेली आहे. म्हणजे सर्वांना स्वतंत्र ठेवले असले तरीही चेक्स ॲन्ड बॅलन्सेस ठेवणारी ही व्यवस्था आहे. तसेच न्यायपालिका तयार करताना 'Doctrine of Stare Decisis' वापरलेला आहे. म्हणजे खालच्या न्यायालयाने त्याच्या वरच्या न्यायालयाने दिलेल्या निवाड्याच्या अनुरुप निवाडा दिला पाहिजे. त्यामुळेच आपण सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या प्रकरणांचा उल्लेख करीत असतो. सर्वोच्च न्यायालयाने एखादा निवाडा दिला तर देशभरातील उच्च न्यायालयांना त्यापेक्षा वेगळा निवाडा देता येत नाही. त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाने एखादा निवाडा दिला तर त्यापेक्षा वेगळा निवाडा दुय्यम न्यायालयांना देता येत नाही. अशा पद्धतीने न्यायव्यवस्थेत एकसूत्रता आणण्याचे काम संविधानाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. या संपूर्ण व्यवस्थेमध्ये प्रत्येकाचे अधिकार व्यवस्थित डिफाईन केलेले आहेत. तसेच पंचायती, नगरपालिका, सहकारी संस्था या सर्वांना संविधानाने जागा दिली आहे, किंबहुना त्यांना महत्त्व देण्याचे काम झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्याकडे सहकारात्मक संघराज्य (Co-operative Federalism) ही व्यवस्था आहे. सहकारात्मक संघराज्यामधील सर्वात महत्त्वाचे उदाहरण कोणते असेल तर ते वस्तू व सेवा कर आहे. आपण या माध्यमातून 'एक देश एक कर' ही संकल्पना अंमलात आणली आहे. हा कायदा जरी केंद्र सरकारने केला असला तरी दोन तृतीयांश राज्यांनी तो ratify केला आहे. सर्व राज्यांनी एकत्रित येऊन वस्तू व सेवा कर परिषद तयार केलेली आहे. या परिषदेमध्ये राज्य व केंद्र यांना समान मते आहेत. त्यामुळे राज्याच्या परवानगीशिवाय वस्तू व सेवा कर परिषदेमध्ये केंद्र सरकार काहीही करू शकत नाही, अशी परिस्थिती आहे. राज्येच वस्तू व सेवा कर परिषद चालवितात. जर वस्तू व सेवा कर संकलन कमी झाले तर आम्ही भरपाई देऊ, असे केंद्र सरकारने आश्वासित केलेले होते. तेच पैसे कोविड काळात केंद्राकडून राज्याला येणे होते. अर्थात, त्या काळात केंद्र सरकारकडे देखील कर संकलनातून कमी रक्कम जमा होत होती. त्यामुळे राज्यांना उशिराने पैसे मिळत होते. परंतु त्याही काळात सर्वाधिक पैसे महाराष्ट्र राज्यालाच केंद्र सरकारने दिल्याचे आपल्याला दिसून येईल. मला एवढेच सांगायचे आहे की, यामध्ये सहकारात्मक संघराज्य पाहायला मिळते.

अध्यक्ष महोदय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे किती दूरदृष्टी होती हे मी सांगणार आहे. भविष्यात केंद्रामध्ये वेगळे आणि राज्यामध्ये वेगळे सरकार असू शकते. अशा वेळी देशातील करांचे वितरण कसे केले जाईल, असा विचार त्यांनी केला. कोणत्याही संघराज्यात्मक संरचनेमध्ये करांचे वितरण चुकीच्या पद्धतीने झाले तर ते फेडरेशन डिसइंटिग्रेट होते हे लक्षात घेऊन त्यांनी संविधानामध्ये वित्त आयोगाची तरतूद केली. माननीय राष्ट्रपती वित्त आयोग नेमतील. देशात येणाऱ्या महसुलाचे वितरण कसे करायचे याचा फॉर्म्युला या आयोगामार्फत निश्चित केला जाईल. त्या फॉर्म्युल्यानुसार विविध राज्यांना महसूल वितरित केला जाईल, अशी व्यवस्था त्यांनी तयार केली.

त्यामुळे केंद्रातील कोणतेही सरकार या राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे, या राज्यात कॉंग्रेस पक्षाचे सरकार आहे किंवा या राज्यात द्रमुकचे सरकार आहे असा भेदभाव करू शकत नाही. असे होऊ नये यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानामध्येच व्यवस्था तयार करुन ठेवलेली आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या संविधानामध्ये वित्तीय व्यवस्थापना संदर्भात अतिशय चांगल्या तरतुदी केलेल्या आहेत. आपण The Fiscal Responsibility and Budget Management Act ( FRBM Act )बद्दल बोलतो. हा कायदा देखील संविधानाचीच देणगी आहे. संविधानानेच आपल्यावर ही जबाबदारी टाकलेली आहे. खरे तर ५० वर्षांपूर्वीच आपण हा कायदा करायला पाहिजे होता जो काही वर्षांपूर्वी आपण केला आहे. या कायद्याची उत्पत्ती संविधानातूनच झालेली आहे. आपली कर्जाची मर्यादा किती असली पाहिजे, वित्तीय व्यवस्थापन कसे केले पाहिजे याबाबत या कायद्यामध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. कुठल्याही परिस्थितीत राज्य दिवाळखोरीकडे जाणार नाही याचाही विचार ७५ वर्षांपूर्वी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला.

अध्यक्ष महोदय, आमचे फेडरेशन कसे आहे हे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, मध्ये एक इमारत आहे आणि त्या इमारतीच्या आजुबाजूला इतर इमारती आहेत. या सर्व इमारती एकमेकांशी जोडलेल्या आहेत. मधली इमारत म्हणजे केंद्र सरकार आणि बाजूच्या इमारती या राज्य सरकारे आहेत. जर आपला देश एकसंघ ठेवायचा असेल तर देशात एकच नागरी सेवा असली पाहिजे. म्हणून त्यांनी One Nation One Service या तत्त्वानुसार अखिल भारतीय सेवेची व्यवस्था तयार केली. सर्व राज्यांमध्ये अखिल भारतीय सेवेचे अधिकारी असतात. एखादे राज्य म्हणू शकत नाही की, आम्हाला हे मान्य नाही. कारण सर्व सेवा अखिल भारतीय आहेत. आपल्या कार्यपालिकेची वहन करणारी व्यवस्था अखिल भारतीय सेवेतून उभी करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, निवडणुकांच्या संदर्भात देखील अतिशय चांगल्या तरतुदी संविधानामध्ये करण्यात आलेल्या आहेत. तरीही आपण वारंवार निवडणूक आयोगावर आरोप करीत असतो. मला असे वाटते की, या विषयीच्या संविधानातील तरतुदी पाहिल्या तर अधिक स्पष्टता येईल.

अध्यक्ष महोदय, संविधानामध्ये आणीबाणीची देखील तरतूद आहे. त्याबाबत मी पुढे विस्ताराने बोलणार आहे.

अध्यक्ष महोदय, भारतीय राज्यघटनेमध्ये एकूण १२ अनुसूची आहेत. त्यातील काही महत्त्वाच्या अनुसूचींबद्दल मी बोलणार आहे. आपण संविधानाची जी शपथ घेतो ती तिसऱ्या अनुसूचीमध्ये देण्यात आलेली आहे. तसेच सातव्या अनुसूचीने केंद्र आणि राज्यांचे अधिकार निश्चित केलेले आहेत. काही अधिकार केंद्राकडे आहेत, काही अधिकार राज्यांकडे आहेत तर काही विषयांमध्ये राज्य व केंद्र अशा दोहोंनाही अधिकार आहेत, असे विषय समवर्ती सूचीमध्ये दर्शविण्यात आलेले आहेत. केंद्राच्या अधिकार क्षेत्रातील विषयांवर केवळ केंद्र सरकार कायदे बनवू शकते. तसेच राज्याच्या अधिकार क्षेत्रातील विषयांवर केवळ राज्य सरकारे कायदे बनवू शकतात. २/३ राज्यांनी जर केंद्र सरकारला विनंती केली की, आमच्यासाठी कायदा करा तरच केंद्र सरकार राज्य सूचीतील विषयांवर कायदा करू शकते. अन्यथा, केंद्र सरकार अशा विषयात काहीही करू शकत नाही. समवर्ती सूचीतील विषयांवर केंद्र व राज्य सरकार दोघेही कायदे करु शकतात. परंतु ज्यावेळी केंद्र सरकार या सूचीतील विषयांवर कायदा करेल त्यावेळी राज्य सरकारच्या कायद्यापेक्षा केंद्र सरकारचा कायदा वरचा मानला जाईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, संविधानाची आठवी अनुसूची भाषेच्या संदर्भातील आहे. आपल्या देशामध्ये हिंदी ही संपर्क भाषा असली तरी संविधानाने सर्व प्रादेशिक भाषांना तेवढाच राष्ट्रीय भाषांचा दर्जा दिलेला आहे. त्यामुळे सर्वच भाषा महत्त्वाच्या आहेत. त्या संदर्भात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण अतिशय सुंदर आहे, ते आपण निश्चितपणे वाचले पाहिजे असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, संविधानाच्या नवव्या अनुसूचीमध्ये जे कायदे जातील त्यांचे न्यायिक पुनर्विलोकन होणार नाही, अशी तरतूद आहे. अर्थात, नंतर न्यायालयाने सांगितले जेथे मूलभूत अधिकारांचा मुद्दा असेल तेथे नवव्या अनुसूचीतील कायद्यांचा देखील न्यायालय रिव्ह्यू करू शकते.

अध्यक्ष महोदय, आपल्या संविधानाने आपल्याला काही मूलभूत तत्त्वे दिली आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे त्यामध्ये कोणताही भेद नाही. अतिशय प्रगत राष्ट्रांमध्ये सुरुवातीला तेथील जे ब्लॅक्स आहेत किंवा ज्यांना त्या काळी निग्रो म्हटले गेले अशा लोकांना मतदानासाठी संघर्ष करावा लागला. इंग्लंडमध्येही संघर्ष करावा लागला. परंतु भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पहिल्या दिवसापासून प्रत्येकाला एका मताचा अधिकार दिला आणि आपल्याला सांगितले की, राजा हा राणीच्या पोटातून पैदा होणार नाही तर मतांच्या पेटीतून पैदा होईल. प्रत्येकाला एका मताचा अधिकार असेल हे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला सांगितले. खरे म्हणजे आपल्याला माहिती आहे की, अमेरिकेतही अशा प्रकारचा भेदभाव होता. रशियाचे संविधान तयार झाले तेव्हाही विशिष्ट व्यक्तींना मतदानाचा अधिकार होता. पण भारतीय संविधानाने मात्र आपल्याला हा अधिकार पहिल्या दिवशीपासून दिला.[१०]

अध्यक्ष महोदय, या संविधानाचे सगळ्यात महत्त्वाचे काही असेल तर शिकागो विद्यापीठातील एक अभ्यासक प्रोफेसर टॉम जिन्सबर्ग यांनी संविधानावर अनेक पुस्तक लिहिली आहेत. १७८९ अमेरिकेचे संविधान बनले. त्यानंतर एकूण १९० बनलेल्या संविधानांचा अभ्यास प्रोफेसर टॉम जिन्सबर्ग यांनी केलेला आहे. जेव्हा त्यांनी याबद्दलचे पुस्तक लिहिले होते त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, "अमेरिकेच्या संविधानाला २०० पेक्षा जास्त वर्ष झाली, त्यांना असे आढळले की अमेरिका आणि भारत ही दोनच संविधाने अशी आहेत की, त्याच्या व्यतिरिक्त सरासरी प्रत्येक संविधानाचे आयुष्य हे फक्त १७ वर्ष राहिलेले आहे. फक्त १७ वर्षे, त्यानंतर ते पूर्ण बदलले." फक्त अमेरिका आणि भारत या दोनच देशांचे संविधान असे आहेत की, अमेरिकेने २०० पेक्षा जास्त वर्ष पूर्ण केले आहेत आणि भारताने ७५ पेक्षा जास्त वर्ष पूर्ण केली आहेत. तसे अनेकांनी सांगितले

की, आपल्या आजूबाजूच्या देशांमध्ये संविधान उरले नाही. तेथे लोकशाही उरली नाही. पण भारताला एक असे संविधान मिळाले की, ७५ वर्षे झाली तरी ते 'पुण्य पुरातन, नित्य नूतन, चिरतरुण आणि तेवढेच प्रगल्भ' अशा प्रकारचे संविधान आपल्याला मिळाले आहे. खरे म्हणजे या संविधानावर संकटे आली नाहीत काय? तर नाही. या संविधानावर अनेक संकटे आली. आज जे 'संविधान बचाव'चा नारा देतात ना, ते संविधान कोणी बदलू शकत नाही. पण 'संविधान बचाव'चा नारा देण्याची वेळ कधी आली होती, ते मी तुम्हाला सांगणार आहे.

अध्यक्ष महोदय, मुळामध्ये १९६७ मध्ये एक सुप्रीम कोर्टामध्ये 'गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य' नावाची केस झाली होती.[११] या केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला होता. त्या निर्णयामध्ये असे सांगितले की, संविधान संशोधन करण्याचे सरकारचे अधिकार अनिर्बंध नाहीत, त्याच्यावर निर्बंध आहेत. त्यामुळे संसदेला संविधानात अनिर्बंध पद्धतीने सुधारणा करता येणार नाही. संसदेला अशा प्रकारच्या सुधारणा करताना संविधानातील काही गोष्टींमध्ये बदल करता येणार नाहीत. या सुधारणेमुळे नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आलेली आहे म्हणून हा कायदा रद्दबातल करीत सरकारवर निर्बंध घातले. त्यावेळी स्वर्गीय श्रीमती इंदिराजींचे सरकार होते. तेव्हा त्या सरकारने सांगितले आम्ही न्यायालयापेक्षा सुप्रीम आहोत. त्यामुळे त्यांनी २४ वी घटना दुरुस्ती करुन संसदेला अनिर्बंध अधिकार आहेत, असे सांगितले. आम्ही संविधानामध्ये बदल करू शकतो, संविधानाच्या कुठल्याही अनुच्छेदात आवश्यक तो बदल करू शकतो. म्हणजे गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला होता तो त्यावेळच्या इंदिराजींच्या सरकारने पूर्णपणे उलट करुन सर्व अधिकार संसदेला आहेत आणि संसद संविधानामध्ये बदल करू शकते अशी संविधानात दुरुस्ती केली. यानंतर २६ वी घटना दुरुस्ती करुन त्यातही पुन्हा संसदेला संविधानातील कुठल्याही अनुच्छेदामध्ये सुधारणा करता येऊ शकते, असा निर्णय केला.

अध्यक्ष महोदय, २४ व्या घटना दुरुस्तीला 'केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य' या प्रकरणामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयात १३ न्यायमूर्तींच्या संपूर्ण खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या अपिलावर निर्णय देताना ६ न्यायमूर्तींनी एका बाजूने तर ७ न्यायमूर्तींनी एका बाजूने निकाल दिला. त्यावेळी या ७ न्यायमूर्तींनी संविधानातील Basic Structure चे doctrine निश्चित केले. त्यांनी सांगितले की, संसदेला संविधानामध्ये बदल करण्याचा अधिकार आहे. पण या संविधानाचे जे Basic Structure आहे त्याला हात लावण्याचा संसदेला अधिकार नाही. त्यानुसार स्वर्गीय श्रीमती इंदिराजींच्या सरकारने केलेली २४ वी आणि २६ वी घटना दुरुस्ती पूर्णपणे रद्दबातल केली. एक प्रकारे पुन्हा एकदा सुप्रिमसी स्थापित केली. आपण आम्हाला अमुक जज, तमूक जज असे सांगत होतात, म्हणून आपल्या माहिती करता सांगतो की, ज्या ६ न्यायमूर्तींनी २४ वी घटना दुरुस्तीच बरोबर आहे असे सांगितले होते, त्यातील जे सरन्यायाधीश ए. एन. राय होते यांना त्या काळामध्ये स्वर्गीय इंदिराजींच्या सरकारने सुप्रीम कोर्टातील तीन वरिष्ठ न्यायमूर्तींना डावलून त्यांना सरन्यायाधीश करण्यात आले होते. कारण काय तर त्यांच्या बाजूने डिसेंट नोट दिली होती. आपण जे न्यायालयाचे सांगत आहात, त्यामध्ये यापेक्षा ढळढळीत उदाहरण काय असू शकते. देशाच्या इतिहासामध्ये दोनच वेळा असे झाले आहे आणि दोन्ही वेळा त्याच काळात झाले आहे. सर्वोच्च न्यायालयामध्ये तीन-तीन ज्येष्ठ न्यायमूर्तींना डावलून त्यांना सरन्यायाधीश केले होते.

अध्यक्ष महोदय, आपल्याला माहिती आहे की, सन १९७१ मध्ये युद्ध झाले आणि १९७२ मध्ये स्वर्गीय इंदिराजी गांधी ह्या प्रचंड मताने जिंकून आल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या पक्षाला ५०८ पैकी ३५३ जागा मिळाल्या होत्या. पण त्यांच्या विरुद्ध लढलेले जे राजनारायण नावाचे उमेदवार होते. त्यांनी स्वर्गीय श्रीमती इंदिराजींच्या निवडणुकीला आव्हान देऊन यामध्ये इलेक्टोरल करप्शन झाले आहे, सरकारी अधिकाऱ्यांना निवडणूक प्रमुख बनविले आहे, सरकारी मशिनरी वापरली आहे, अशा विविध गोष्टींचा उल्लेख केला. अलाहाबाद उच्च

न्यायालयात ती केस चालली. साक्षी पुरावे झाले, देशाच्या पंतप्रधानांनाही यावेळी हायकोर्टात जावे लागले होते आणि १२ जून १९७५ ला अलाहाबाद हायकोर्टचे न्यायमूर्ती जगमोहन यांनी स्वर्गीय श्रीमती इंदिराजींची निवडणूक रद्द केली आणि स्व. इंदिराजींवर ६ वर्षे निवडणूक लढण्याकरिता बंदी घातली. त्या निर्णयावर स्व. इंदिराजींनी माननीय सर्वोच्च न्यायालयात अपिल केले. त्या ठिकाणी न्यायमूर्ती के. व्ही. कृष्णा अय्यर यांनी १२ दिवसांनी २४ जून १९७५ ला निकाल दिला आणि त्या निकालामध्ये सांगितले की, आम्हाला अलाहाबाद हायकोर्टाचा निकाल प्रथम दर्शनी योग्य वाटतो. त्यामुळे आम्ही त्यावर स्थगिती देणार नाही. मात्र प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत स्व. इंदिराजी सभागृहाच्या सदस्य म्हणून राहतील, तद्वतच त्या प्रधानमंत्रीही राहतील. पण सभागृहात मतदानामध्ये किंवा तत्सम कामकाजात त्यांना सहभागी होता येणार नाही. हा निकाल दिनांक २४ जून १९७५ मध्ये दिल्यानंतर त्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ मध्ये देशात आणीबाणी लागली.[१२] या देशातील सुप्रीम कोर्टाने निकाल दिल्यानंतर तो मान्य नाही म्हणून या देशामध्ये आणीबाणी लागली.

अध्यक्ष महोदय, १९७१ मध्ये युद्धाच्या काळामध्ये एक MISA कायदा तयार केला होता. त्या कायद्याचे पूर्ण नाव 'Maintenance of Internal Security Act'. हा जो MISA कायदा होता त्यानुसार व्यक्तीला कुठलाच मूलभूत अधिकार नव्हता. त्यामध्ये कुठलीही छाननी होत नव्हती. काहीही नाही.

अध्यक्ष महोदय, ही आणीबाणी लागल्यानंतर देशात काय झाले होते? आपण 'संविधान बचाव', 'संविधान बचाव', म्हणता पण तेव्हा काय झाले होते तर मूलभूत अधिकार कायद्याने... डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, मला सर्वात जास्त प्रिय मूलभूत अधिकार आहेत. ते मूलभूत अधिकार निलंबित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, मला सर्वात जास्त प्रिय मूलभूत अधिकार आहेत. परंतु कॉंग्रेस सरकारने ते मूलभूत अधिकारच सस्पेंड केले. अभिव्यक्ती स्वातंत्र्य समाप्त केले. जर एखाद्याला वर्तमानपत्र काढायचे असेल तर कमिटीकडे जाऊन ते वर्तमानपत्र दाखवावे लागत होते. तरच ते वर्तमानपत्र छापता येत होते. कोणाला पुस्तक लिहायचे असेल तर त्यासाठी सेन्सॉर बोर्ड

तयार केले होते. अशा प्रकारच्या व्यवस्था निर्माण केल्या होत्या. इतकेच नाही तर राज्य कायद्याने नाही तर हुकुमाने चालेल, अशा प्रकारची व्यवस्था निर्माण केली होती. गायक श्री. किशोर कुमार यांनी ही आणीबाणी योग्य नाही, असे म्हटल्यामुळे तत्कालीन सरकारने त्यांच्या गाण्यावर बंदी टाकली होती. आकाशवाणीवर गाणे वाजवण्यास बंदी टाकून गाणे वाजवणे बंद केले होते. एवढे एक्सेसेस (Excesses) आहेत की, खरे तर ते सांगण्याची ही जागा नाही. त्या काळात जॉर्ज फर्नांडिस यांच्या परिवार सोबत जे काही झाले आहे, ते सांगितले तर आजही माझ्या डोळ्यात पाणी येतं आणि माझ्या अंगावर काटे उभे राहतात. अशी त्यावेळची अवस्था होती.

अध्यक्ष महोदय, आता विरोधी पक्षातील नेते मंडळी ईडी, सीबीआयची नावे घेतात. परंतु तत्कालीन काँग्रेस सरकारने विरोधी पक्षातील एक लाखापेक्षा जास्त लोकांना जेलमध्ये टाकले होते. त्यावेळी माझे वडील दोन वर्ष जेलमध्ये होते. आमच्या काकू श्रीमती शोभाताई फडणवीस दोन वर्ष जेलमध्ये होत्या. येथील अनेकांच्या परिवारातील लोक जेलमध्ये होते. आमचे स्व. पांडुरंग फुंडकर हे देखील जेलमध्ये होते. या लोकांचा काहीही अपराध नसताना देखील तत्कालीन सरकारने MISA कायद्यांतर्गत जेलमध्ये टाकले. त्यावेळी या लोकांनी अपराध काय केला, हे सांगायला देखील कोणी तयार नव्हते. केवळ तुम्ही विरोधी पक्षाचे सदस्य आहात, म्हणून या देशामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान गोठवून विरोधी पक्षातील सर्वांना जेलमध्ये टाकण्याचे काम केले होते. [१३] त्याच वेळी कवी सुरेश भट यांनी म्हटले होते की,

“उभा देश झाला आता, एक बंदी शाळा
इथे देवकीचा पान्हा, दुधाने जळाला
कसे पुण्य दुर्दैवी अन्, पाप भाग्यशाली,
अरे पुन्हा आयुष्याच्या, पेटवा मशाली”

एवढे करून ते अजून थांबले नाहीत. त्यानंतर त्यांनी ४२ वी घटना दुरुस्ती केली. या ४२ व्या घटना दुरुस्तीला काय म्हणतात, माहिती आहे काय? या दुरुस्तीला ‘Mini Constitution’ म्हटले जात होते. या ४२ व्या घटना

दुरुस्तीवेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामध्ये ९९ बदल केले होते. या ४२ व्या घटना दुरुस्तीमध्ये देशाचे पंतप्रधान आणि लोकसभेचे अध्यक्ष हे न्यायालयाच्या कक्षेत येणार नाहीत, असा बदल केला होता. तो बदल पूर्वलक्षी प्रभावाने लागू करून या निवडणुका न्यायालयाच्या कक्षेच्या बाहेर काढल्या आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाने स्व. इंदिरा गांधी यांच्या विरुद्ध दिलेला निकाल निरस्त करण्याचे काम केले. इतकेच नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा संविधान लिहिले तेव्हा संविधानाच्या उद्देशिकेमध्ये भारत सार्वभौम लोकतांत्रिक गणराज्यच होता. परंतु स्व. इंदिरा गांधी यांनी आणीबाणीच्या काळात संविधानाच्या उद्देशिकेमध्ये समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द टाकले. हे शब्द भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी टाकले नाहीत. म्हणजे ते मूळ संविधानामध्ये नाहीत. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हे माहिती होते की, या देशाचा मूळ आत्माच धर्मनिरपेक्ष आहे. या देशातील लोकांनी विशेषतः येथे राहणाऱ्या बहुसंख्य भारतीय व हिंदू समाजाने कधीही तलवारीच्या जोरावर जगावर विजय मिळवण्याचा प्रयत्न केला नाही. जगाने ज्यांना बहिष्कृत केले, परिष्कृत केले त्या सर्वांना या भारताने आपल्याकडे सामावून घेतले आणि त्यांना या भारताचा हिस्सा केले. म्हणून ते शब्द पूर्वी टाकले नव्हते. परंतु तत्कालीन सरकारने हा बदल केला आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वात महत्त्वाची बाब अशी आहे की, राज्य सूचीमधील अनेक महत्त्वाचे विषय म्हणजे, शिक्षण, वने, वजनमाप, वन्यप्राणी, पक्षीसंवर्धन, न्यायव्यवस्था हे सर्व राज्य सूचीमध्ये विषय होते. परंतु तत्कालीन सरकारने हे सर्व केंद्रीय सूचीमध्ये घेतले. म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यांना दिलेले सगळे अधिकार केंद्रीकृत करण्याचे काम ४२ व्या घटना दुरुस्तीमध्ये केले आहे.

अध्यक्ष महोदय, या बदलासोबत त्यांनी अजून एक महत्त्वाचा बदल केला आहे. तो म्हणजे केंद्र सरकार केंद्राचे पोलीस कोणत्याही राज्यामध्ये त्या राज्याच्या परवानगीशिवाय डिप्लॉय करू शकतील. म्हणजे एक प्रकारे राज्यांवर कब्जा केला जात होता. परंतु आज तसे करू शकत नाहीत. जर राज्य सरकारने

ठरविले की, राज्यामध्ये सीबीआयला येऊ द्यायचे नाही, तर ते राज्यामध्ये येऊ शकत नाहीत. सीबीआयला अधिकारक्षेत्र नाही. राज्याने मान्य केल्याशिवाय अधिकारक्षेत्र नाही. केंद्र सरकारच्या कोणत्याही केंद्रीय राखीव पोलीस दलाला राज्याच्या परवानगीशिवाय राज्यामध्ये येता येत नाही. परंतु ४२ व्या घटना दुरुस्तीमध्ये कोणत्याही राज्यामध्ये जाऊन कब्जा करता येईल, अशी व्यवस्था उभी केली होती.

अध्यक्ष महोदय, आपल्या सर्वांना माहिती आहे की, माननीय राष्ट्रपती व माननीय राज्यपालांना काही विशेष अधिकार आहेत. माननीय राष्ट्रपती व माननीय राज्यपाल राज्य शासनाने घेतलेला एखादा निर्णय परत पाठवू शकतात. पुनर्विचार करा म्हणू शकतात. काही निर्णय तर ते रद्दबातल देखील करू शकतात. परंतु या ४२ व्या घटनादुरुस्तीने सांगितले की, राष्ट्रपती कठपुतळी म्हणून काम करतील. एकदा निर्णय घेतला आणि तो राष्ट्रपतीकडे गेला तर राष्ट्रपतींनी त्यावर सहीच केली पाहिजे, मान्यच केली पाहिजे, No Reconsideration, No Rejection याला Concentration of Power म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी Separation of Power केले होते ते उद्ध्वस्त केले आणि या निमित्ताने सगळे अधिकार आपल्याकडे घेण्याचे काम केले. एवढेच नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की, 'Directive Principles of State Policy' हे नंतर येईल. पहिल्यांदा मूलभूत अधिकार येतील. मूलभूत अधिकारासाठी अनुच्छेद ३२..... मघाशी मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण वाचून दाखविले. या घटनादुरुस्तीने सांगितले की, मूलभूत अधिकार नंतर येतील. आधी 'राज्य धोरणांची निदेशक तत्वे' येतील. 'राज्य धोरणांची निदेशक तत्वे' प्रमाणे आम्ही जर कायदे केले, तर न्यायालयाला त्याच्यावर रिव्ह्यू करण्याचा अधिकारच असणार नाही. म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषणामध्ये सांगितले होते की, अनुच्छेद ३२ हा माझ्या हृदयाच्या सर्वात जवळचा अनुच्छेद आहे. तो अनुच्छेद वापरण्याचा अधिकार या ४२ व्या घटनादुरुस्तीने काढून टाकला. नो रिट ज्युरिस्डीक्शन हायकोर्टात नाही की सुप्रीम कोर्टात नाही. आपण न्यायव्यवस्थेवर काय बोलता.

काँग्रेस सरकारने न्यायव्यवस्थाच संपवून टाकली. या देशातील न्यायव्यवस्था केवळ व्यक्तीच्या हातामध्ये केंद्रित करण्याचे काम ४२ व्या घटनादुरुस्तीने केले आहे. या दुरुस्तीमध्ये तीन नवीन 'राज्य धोरणांची निदेशक तत्वे' तयार केली. त्यामुळे सर्व विषयांमध्ये कायदा करायचा अधिकार केंद्र सरकारला मिळाला. अशा प्रकारची दुरुस्ती केल्यामुळे तो कायदा न्यायालय कक्षेच्या बाहेर गेला. मी ९९ च्या ९९ कलमे सांगत नाही. परंतु काही प्रमुख कलमे सांगितलेली आहे.

अध्यक्ष महोदय, या घटना दुरुस्तीनंतर केंद्रातील सरकार गेले आणि जनता सरकार आले. जनता सरकारने ४४ व्या घटना दुरुस्तीमध्ये यातील बऱ्याच गोष्टी ठीक केल्या. परंतु जनता सरकारला राज्यसभेमध्ये बहुमत नसल्यामुळे जनता सरकार सगळ्या सुधारणा रिव्हर्स करू शकले नाही. परंतु पुन्हा न्यायालयाने 'मिनर्व्हा मिल्स वि. भारत सरकार' या केसमध्ये पहिल्यांदा बेसिक स्ट्रक्चरचे डॉक्ट्रिन डीफाइन केले. आपण याचा प्रवास पाहिला तर गोलकनाथ च्या केसमध्ये न्यायव्यवस्थेने आपले वर्चस्व सांगितले. ते न्यायव्यवस्थेचे वर्चस्व संसदेने म्हणजे स्वर्गीय श्रीमती इंदिरा गांधी यांनी २४ व्या घटना दुरुस्तीने निरस्त केले. पुन्हा केशवानंद भारती केसमध्ये न्यायव्यवस्थेने आपले वर्चस्व सांगितले. ४२ व्या घटना दुरुस्तीने पुन्हा न्यायव्यवस्थेचे वर्चस्व संपवले आणि संसदेचे वर्चस्व सांगितले. परंतु मिनर्व्हा मिल्स केस यापेक्षा वेगळी आहे. मिनर्व्हा मिल्स केसने सांगितले न्यायालय पण सर्वोच्च नाही, संसद पण सर्वोच्च नाही, केवळ आणि केवळ संविधान सर्वोच्च आहे.

अध्यक्ष महोदय, यातून संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व स्थापन केले गेले आणि त्यामध्ये Doctrine of Basic Structure आले. या डॉक्ट्रिनमध्ये न्यायपालिका किंवा संसद नाही तर संविधान सर्वोच्च आहे. भारताची एकता व एकात्मता याच्या विरोधात कुठला कायदा करता येणार नाही, न्यायनिर्णय देता येणार नाही. लोकशाही संघराज्य पद्धतीचा सरकार हा आत्मा आहे. याच्यामध्ये अमेंडमेंट करता येणार नाही. संविधानाचे संघराज्यात्मक वैशिष्ट बदलता येणार नाही. संविधानाची धर्मनिरपेक्षता बदलता येणार नाही. सत्ताविभाजनाचा सिद्धांत

बदलता येणार नाही. व्यक्तिगत आणि मूलभूत स्वातंत्र्य हे बदलता येणार नाही. कायद्यानेच राज्य करावे लागेल, ऑर्डरने नाही. न्यायिक पुनर्विलोकन ही संविधानिक शक्ती आहे. त्यामुळे एखाद्या कायद्याचे न्यायिक पुनर्विलोकन होणार नाही, असे ४२व्या घटना दुरुस्तीने केले ते आता करता येणार नाही, हे बेसिक स्ट्रक्चर मध्ये आहे. संसदीय पद्धत, समतेचे नियम, मुक्त आणि निष्पक्ष निवडणूका, संसदेला संविधान संशोधनाचे मर्यादित अधिकार आणि रीट ज्युरिस्डीक्शन या गोष्टी नॉन-निगोशीएबल आहेत असे मिनर्वा मिल्स केसमध्ये सांगितले आहे. यामध्ये परिवर्तन करता येणार नाही. त्यामुळे संविधान बदलणार, संविधान बदलणार असा टाहो फोडणाऱ्यांनी आणि छाती बडवणाऱ्यांनी हे समजून घेतलं पाहिजे की आता संविधान बदलण्याचा अधिकार कोणालाच नाही. सन १९६७ ते सन १९७७ या कालखंडात सातत्याने संविधान बदलण्याचे काम झाले. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने शेवटी हे लक्षात घेतलं की, संविधानातील लवचिकता जर अशीच राहिली आणि याचं योग्य इंटरप्रिटेशन झाले नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितल्याप्रमाणे, कुठलेही संविधान वाईट नसते, संविधान वागवणारे कसे आहेत याच्या आधारावर ते संविधान चांगलं किंवा वाईट ठरते. त्यामुळे १९६७ ते १९७७ या काळात संविधानात झालेले बदल व नंतर मिनर्वा मिल्स केसमध्ये न्यायालयाचा आलेला निर्णय पाहता हे आपल्याला लक्षात येईल की आता जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहे तोपर्यंत भारताच संविधान कोणीच बदलू शकत नाही.

अध्यक्ष महोदय, संविधानाला आता धोका नाहीये, धोका झाला होता तो संपलेला आहे. आता कोणीही धोका करू शकत नाही. त्यामुळे आपण दुसऱ्या कुठल्यातरी गोष्टीवर आपली शक्ती खर्च करावी, असं मला वाटते. संविधानामध्ये फरक एवढाच आहे की, शहाबानो यांच्या प्रकरणात दिलेला निकाल बदलण्याकरता तुम्ही संविधान बदललं आणि तीन तलाक संपवण्याकरिता आम्ही संशोधन केले. म्हणून संविधानाने सीतेची मुक्तता दाखवली आहे. आपल्याला माहिती आहे की, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अनुच्छेद ३७० चा संविधानात समावेश करण्यासाठी आग्रह केला तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की,

मी ड्राफ्टच करणार नाही. त्यांनी सांगितलं की, “तुम्ही रस्ते, रेशन, सोयी अशा सगळ्या गोष्टी आमच्याकडून घ्यायच्या आणि स्वतंत्र संविधान आणि स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा मिळवायचा, हे मला मान्य नाही.” मग त्यावर खूप चर्चा झाल्या आणि शेवटी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एकाच गोष्टीवर मान्यता दिली की, हे अनुच्छेद कायमस्वरुपी असणार नाही. हे तात्पुरते असेल आणि म्हणूनच ते बाबासाहेबांचे स्वप्न माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी पूर्ण करुन अनुच्छेद ३७० हे संपवण्याचं काम केले. खरं म्हणजे सन २०१५ पासून आपण ‘संविधान दिवस’ पाळणे सुरु केले. ‘हर घर तिरंगा’ अभियानासारखे आता ‘हर घर संविधान’ अशा प्रकारचा एक कार्यक्रम आपण हातामध्ये घेतलेला आहे. मला सांगताना आनंद वाटतो की, आता आपल्या पाठ्यपुस्तकांच्याही कव्हरवर मागे किंवा आतमध्ये संविधानाची उद्देशिका आपण छापतो आहे. जेणेकरून आपल्या मुलांना ती वाचता आली पाहिजे. एवढेच नाही तर आपण मूल्य शिक्षण सुरू करीत आहोत. हे मूल्य संविधानिक मूल्य आहे. शालेय शिक्षणामध्ये संविधानिक मूल्य शिकवण्याकरता अत्यंत महत्त्वाचे काम सुरु केलेले आहे. ४३४ आयटीआय मध्ये संविधान मंदिराची निर्मिती आपण केली आहे. मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात संविधान मंदिर तयार केलेले आहे. तसेच प्रत्येक तालुक्यामध्ये आपण संविधान भवन त्या ठिकाणी उभारणार आहोत.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्य यांनी सांगितले की, न्यायाधीश हे राज्यसभेचे सदस्य होतात. त्यांना मी सांगू इच्छितो की, ही काही आजची परंपरा नाही. न्यायमूर्ती एम. सी. छागला सन १९४७-५८ या कालावधीत न्यायाधीश होते. त्यानंतर ते राजदूत झाले. मग काँग्रेस पक्षाच्या सरकारमध्ये शिक्षण आणि परराष्ट्रमंत्री झाले. न्यायमूर्ती के. एस. हेगडे हे आधी राज्यसभेवर निवडून गेले. मग न्यायाधीश झाले, मग लोकसभेवर गेले. न्यायमूर्ती कोका सुब्बा राव हे देशाचे मुख्य न्यायाधीश, यांनी राष्ट्रपतीची निवडणूक लढवली. न्यायमूर्ती बहारुल इस्लाम काँग्रेस पक्षाकडून राज्यसभा सदस्य होते. राजीनामा देऊन मग आसाम हायकोर्टात न्यायाधीश म्हणून गेले. मग सन १९८० मध्ये निवृत्त झाले, पुन्हा सन १९८३ मध्ये सुप्रीम कोर्टात निवृत्ती झाली. पुन्हा काँग्रेस

पक्षाकडून लोकसभेचे उमेदवार झाले. पुन्हा काँग्रेस पक्षाने त्यांना राज्यसभेत पाठवले. न्यायमूर्ती मोहम्मद हिदायतुल्ला सन १९६८-८२ या काळात दोनदा कार्यकारी राष्ट्रपती झाले. मग उपराष्ट्रपती देखील झाले. न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा ओरिसा हायकोर्टचे जज होते. नंतर काँग्रेस पक्षाकडून राज्यसभेमध्ये गेले. विजय बहुगुणा आधी न्यायाधीश होते. नंतर मुख्यमंत्री झाले. आता सन २०१८ साली न्यायमूर्ती अभय ठिपसे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे ही काही परंपरा नवीन नाहीये. मला असं वाटतं की, एक लक्षात ठेवा तुम्ही इतिहास विसरता आणि जे इतिहास विसरतात त्यांना वर्तमान असतं पण त्यांना भविष्य नसतं. जे इतिहास विसरतात त्यांचा भूगोल कधीच शाबुत राहत नाही. त्यामुळे इतिहास लक्षात ठेवा. या देशाच्या संविधानावर जी संकटे आली त्या संकटांमुळे हे संविधान इतके परिपक्व झालेले आहे की, या संविधानाशी कोणी छेडछाडही करू शकत नाही. या संविधानाला कोणी काही अपाय देखील करू शकत नाही. खरे म्हणजे लक्षात ठेवा हे शतक भारताचे शतक आहे. आता भारताची प्रगती चाललेली आहे. आज लोक असे म्हणतात की, "What is the World? The United States of America, China and India is the World". आज जग या तीन देशांभोवती पूर्णपणे फिरत असल्याचे पाहायला मिळते. मला असं वाटतं की या संपूर्ण आपल्या वाटचालीमध्ये आणि भारताच्या या युगामध्ये भारतातल्या प्रत्येक व्यक्तीचं विकासाचं अस्त्र जर काही असेल तर ते भारताचे संविधान आहे. एक अतिशय सुंदर न्याय देणारे, प्रत्येकाच्या स्वप्नांना पंख देणारे जगातले सर्वोत्तम संविधान दिल्याबद्दल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शतशः आभार मानतो, त्यांना शतशः नमन करतो या संविधानाला शतशः नमन करतो आणि माझं बोलणं संपवतो. धन्यवाद!

# संदर्भ सूची

## १. कॅबिनेट मिशन बद्दल अधिक माहिती-

दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटनची ढासळलेली अर्थव्यवस्था, अमेरिका व सोव्हिएत रशियाचा वाढता प्रभाव व त्यांचा भारताच्या स्वातंत्र्यास असलेला पाठिंबा, भारतीय स्वातंत्र्याची अहिंसक चळवळ, क्रांतिकारी लढे आणि त्यासोबतच आझाद हिंद सेनेच्या कारवाया यामुळे ब्रिटनकडे भारतातून काढता पाय घेण्याशिवाय पर्याय राहीला नव्हता. अधिक जनक्षोभ टाळण्यासाठी व शांततेच्या मार्गाने सत्ता हस्तांतरीत करण्याच्या उद्देशाने कॅबिनेट मिशन पाठविण्यात आले होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यातील कळीच्या मुद्द्यांवर मार्ग काढणे, अंतरिम सरकार स्थापना व स्वतंत्र भारताच्या संविधानाच्या निर्मितीचा आराखडा तयार करणे हे या मिशनचे उद्दीष्ट होते. मात्र भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यात अनेक मुद्द्यांवर मतभेद कायम राहिल्याने कॅबिनेट मिशनचा प्रस्ताव कागदावरच राहिला.

## २. भारत सरकार कायदा, १९३५ -

ब्रिटन शासित भारताच्या प्रशासनासाठी एक चौकट तयार करण्याच्या उद्देशाने व भारतातील प्रांतांना अधिक स्वायत्तता देण्याच्या उद्देशाने हा कायदा करण्यात आला होता. मात्र या कायद्याने पूर्ण स्वातंत्र्य नाकारल्याने, संरक्षण आणि परराष्ट्र व्यवहार या सारखे महत्त्वपूर्ण विषय ब्रिटिशांनी स्वतःच्या नियंत्रणात ठेवल्याने तसेच स्वतंत्र मतदारसंघांमुळे जातीय विभाजन वाढून स्वातंत्र्य चळवळ कमकुवत होण्याची शक्यता असल्याने या कायद्यास भारतीयांनी विरोध केला.

पुढे संपूर्ण स्वातंत्र्याचा आग्रह धरत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महात्मा गांधींच्या नेतृत्त्वात १९४२ मध्ये भारत छोडो चा नारा दिला.

## ३. संविधान सभा -

भारत सरकार कायदा, १९३५ नुसार १० ते १२ टक्के भारतीयांना प्रांतिक

विधानसभेसाठी मतदान करण्याचा हक्क मिळाला. मालमत्ता व शिक्षण या आधारे हा हक्क प्रदान करण्यात आल्यामुळे मतदारांमध्ये महिलांचा सहभाग अत्यल्प होता.

१९४६ मध्ये निवडून आलेल्या प्रांतिक विधानसभांच्या सदस्यांनी संविधान सभेच्या २९२ सदस्यांना निवडून दिले. पाकिस्तान स्वतंत्र झाल्यानंतर सदस्यांची एकूण संख्या २९९ झाली. यातील २२९ सदस्य १२ प्रांतिक विधानसभांमधून निवडून आले होते तर ७० सदस्य २९ संस्थानांनी नामनिर्देशित केलेले होते. यामध्ये १५ महिला सदस्यांचा समावेश होता.

संविधान सभेची पहिली बैठक (९ डिसेंबर १९४६) ते संविधानाचा स्वीकार (२६ नोव्हेंबर १९४९) हा कालावधी २ वर्ष ११ महिने १७ दिवसांचा आहे. या काळात संविधान सभेची ११ सत्रे पार पडली.

२२ जुलै १९४७ रोजी संविधान सभेने राष्ट्रीय ध्वजाचा स्वीकार केला. १४ ऑगस्ट १९४७ च्या रात्री संविधान सभेचे रुपांतर देशाच्या विधानसभेत झाले.

२४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेची शेवटची बैठक झाली. या बैठकीत जन गण मन या गीताचा राष्ट्रगीत म्हणून स्वीकार करण्यात आला व स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांची निवड करण्यात आली.

**४ . मसुदा समिती -**

२९ ऑगस्ट १९४७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची स्थापना झाली. संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी समितीने १४१ दिवस काम केले. ४ नोव्हेंबर १९४८ रोजी अंतिम मसुदा संविधान सभेला सादर करण्यात आला.

या मसुद्यावर संविधान सभेने १६५ दिवस चर्चा केली. मसुद्याला ७,६३५ सुधारणा सुचविण्यात आल्या. यापैकी २,४७३ सूचना विचारात घेण्यात आल्या.

अंतिमतः मंजूर झालेल्या संविधानात ८ अनुसूचींसह २२ भागात विभागलेल्या ३९५ अनुच्छेदांचा समावेश होता.

## ५ . संविधानातील आरेखनांबद्दलची अधिक माहिती–

(अधिक माहितीसाठी QR कोड स्कॅन करावा)

**६.** “भारतीय समाज स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांसाठी नेहमीच उभा राहिला आहे — फ्रेंच राज्यक्रांतीमुळे ज्या मूल्यांना प्रसिद्धी मिळाली, ती मूल्ये आपल्या बुद्धाने खूप आधीच दिली होती.” - डॉ. आंबेडकर

“राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला दिलेले मूलभूत अधिकार हे व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा आणि मानव्यतेचा आदर करणाऱ्या आपल्या प्राचीन भारतीय आदर्शांशी सुसंगत आहेत." - पंडित नेहरु

“भारतीय राज्यघटना ही भारतीय मनाचे प्रतिबिंब आहे. ती आपल्या सांस्कृतिक मूल्यांमध्ये रुजलेल्या दीर्घ ऐतिहासिक उत्क्रांतीचा परिपाक आहे."

“भारतामधील लोकशाही ही उधार आणलेली नाही. ती आपल्या सांस्कृतिक परंपरेतूनच नैसर्गिकपणे विकसित झाली आहे." - डॉ एस राधाकृष्णन

“भारतीय राज्यघटना हा केवळ कायदेशीर दस्तऐवज नाही; ती भारतीय संस्कृतीने जोपासलेल्या नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे प्रतिबिंब आहे." - न्या. पी. बी. गजेंद्रगडकर, माजी मुख्य न्यायाधीश

“सहिष्णुता, बहुविधता आणि तार्किक संवाद हे आपण पाश्चात्यांकडून स्वीकारलेले नाही – ती भारतीय परंपरेत खोलवर रुजलेली मूल्ये आहेत आणि ती आपल्या राज्यघटनेतही प्रतिबिंबित झाली आहेत."- प्रा. अमर्त्य सेन, नोबेल पारितोषिक विजेते.

"भारतीय राज्यघटना ही भूतकाळाशी फारकत घेत नाही, तर ती भारतीय सांस्कृतिक मूल्यांचेच विस्तारीत रूप आहे – जिच्यामध्ये हक्क आणि कर्तव्ये यांना कायदेशीर अधिष्ठान मिळाले आहे."- प्रा. उपेंद्र बक्षी, कायदेतज्ञ

**७. मूलभूत हक्क -**

मूलभूत हक्क म्हणजे भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना हमी दिलेले मूलभूत मानवी स्वातंत्र्य आहे. हे हक्क समानता, मानवी प्रतिष्ठा आणि मनमानी राज्य कारभारापासून नागरिकांचे संरक्षण सुनिश्चित करतात. हे अधिकार संविधानाच्या भाग तीन मध्ये नमूद करण्यात आले असून ते व्यक्तिगत विकास आणि लोकशाहीसाठी अत्यावश्यक आहेत.  या हक्कांचे हनन झाल्यास नागरिक न्यायालयात दाद मागू शकतात.

१. समानतेचा हक्क (अनुच्छेद १४ ते १८): अनुच्छेद १४: कायद्यापुढे समानता अनुच्छेद १५: धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान यावर आधारित भेदभावास मनाई अनुच्छेद १६: सार्वजनिक नोकऱ्यांमध्ये संधीची समानता अनुच्छेद १७: अस्पृश्यता नष्ट करणे अनुच्छेद १८: किताब नष्ट करणे

२. स्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद १९ ते २२): अनुच्छेद १९: भाषणस्वातंत्र्य व इतर अधिकारांचे संरक्षण अनुच्छेद २०: गुन्हेगारी शिक्षा संदर्भात संरक्षण अनुच्छेद २१: जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण अनुच्छेद २१ (अ): शिक्षणाचा अधिकार

अनुच्छेद २२: काही बाबतीत अटक व नजरकैद विरोधात संरक्षण

३. शोषणाविरुद्ध हक्क (अनुच्छेद २३ ते २४): अनुच्छेद २३: मानवी तस्करी व सक्तीच्या कामावर (वेठ) बंदी अनुच्छेद २४: बालकांना कामावर ठेवण्यास मनाई

४. धर्मस्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद २५ ते २८): अनुच्छेद २५: विवेक स्वातंत्र्य व धर्माचे स्वातंत्र्य – प्रचार, आचरण व प्रसार अनुच्छेद २६: धार्मिक कार्यांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य अनुच्छेद २७: विशिष्ट धर्माच्या प्रचारासाठी कर भरण्याचे स्वातंत्र्य अनुच्छेद २८: विशिष्ट शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण किंवा उपासनेस उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य

५. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (अनुच्छेद २९ ते ३०): अनुच्छेद २९: अल्पसंख्याकांच्या हितांचे संरक्षण अनुच्छेद ३०: अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन व व्यवस्थापन करण्याचा अधिकार

६. संविधानिक उपाय योजण्याचा हक्क (अनुच्छेद ३२ ते ३५)ः अनुच्छेद ३२ः या भागात दिलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी उपाय अनुच्छेद ३३ः या भागात प्रदान केलेले अधिकार सेना इत्यादींना लागू करताना त्यात बदल करण्याचा संसदेचा अधिकार अनुच्छेद ३४ः एखाद्या क्षेत्रात लष्करी कायदा अमलात असताना या भागातील अधिकारांवर निर्बंध अनुच्छेद ३५ः या भागातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी कायदे करण्याचा अधिकार

**८. राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे –**

राज्याच्या ध्येय धोरणांना दिशा देण्याचे काम निदेशक तत्त्वे करतात. सामाजिक व आर्थिक न्याय अधोरेखित करणाऱ्या या तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी नागरिकांना न्यायालयात दाद मागता येत नसली तरी धोरणे आणि कायदे बनविताना या तत्त्वांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेण्याची जबाबदारी शासनाची असते.

नुकतेच स्वातंत्र्य मिळालेले असल्याने आर्थिक संसाधनांची कमतरता व त्यावेळी देशात असलेली प्रचंड सामाजिक विविधता व आर्थिक मागासलेपण या कारणांमुळे ही तत्त्वे कायद्याने बांधकारक करता आली नाहीत.

**काही महत्त्वाची निदेशक तत्त्वे पुढील प्रमाणे –**

- ➢ सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्रस्थापित करून जनतेच्या कल्याणासाठी समाजव्यवस्था निर्माण करणे
- ➢ उत्पन्न, दर्जा, सुविधा व संधीतील असमानता कमी करणे
- ➢ पुरुष व महिला यांना समान वेतन मिळावे
- ➢ सर्वांसाठी समान न्याय व गरीबांना मोफत कायदेशीर मदत मिळावी
- ➢ बेरोजगार, वृद्ध, आजारी व अपंग व्यक्तींना काम, शिक्षण व सार्वजनिक मदतीचा हक्क मिळावा
- ➢ कामगारांना उपजीविकेसाठी योग्य वेतन, जीवनमान व सामाजिक-सांस्कृतिक संधी प्रसूतीसहाय्य मिळावे
- ➢ पोषण, आरोग्यदायी जीवनमान व सार्वजनिक आरोग्य यात सुधारणा करणे
- ➢ गावांमध्ये खाजगी व सहकारी तत्त्वावर लघुउद्योगांना प्रोत्साहन

- स्वयंसेवी सहकारी संस्थांची निर्मिती, स्वायत्तता व व्यावसायिक व्यवस्थापनास प्रोत्साहन
- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक हितांचे रक्षण
- गाई, वासरे, दुभती जनावरे, जुंपणीची गुरे यांच्या जातींचे जतन, सुधारणा आणि कत्तलीस मनाई करणे
- देशभर एकसमान नागरी संहिता
- ६ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी बालसंगोपन व शिक्षण
- वन्यजीव, पर्यावरण व जैवविविधतेचे रक्षण व संवर्धन
- राष्ट्रीय महत्त्वाच्या ऐतिहासिक व कलात्मक स्थळांचे रक्षण
- आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा या संवर्धन

**९. सत्ताविभाजनाचा सिद्धांत (Doctrine of Separation of Powers) -**

भारतीय संविधानामध्ये कायदे मंडळ (संसद व विधिमंडळ), कार्य पालिका (मंत्री परिषद) व न्याय पालिका (न्यायालये) या लोकशाहीच्या तीन अंगांच्या कार्यकक्षा व अधिकार वेगळे करण्यात आले आहेत. यालाच सत्तांचे विभाजन (Doctrine of Separation of Powers) म्हणतात. या संदर्भात महत्त्वपूर्ण नोंदी -

“सत्तांचे विभाजन हे राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा भाग आहे. विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांना स्वतंत्र व विशिष्ट अधिकार व जबाबदाऱ्या दिल्या आहेत, जेणेकरून लोकशाही व्यवस्था सक्षम व संतुलित राहील." - न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड (केशवानंद भारती वि. कर्नाटक राज्य, १९७३)

“भारतीय राज्यघटना कठोर सत्ता विभाजनावर आधारलेली नसून ‘चेक्स अँड बॅलन्सेस’ या तत्त्वावर आधारित आहे, जिथे सर्व घटकांमध्ये समन्वय व सहकार्य आवश्यक आहे." - ग्रॅनव्हिल ऑस्टिन (राज्यघटनाकार व अभ्यासक)

"भारतीय संविधानिक रचनेत सत्तांचे विभाजन हे कठोर स्वरूपात नसले तरी, त्या मागचे परस्पर सन्मान व संयम — हे तत्त्व प्रत्येक घटकाच्या कार्यपद्धतीला दिशा देते." - न्यायमूर्ती पी. एन. भगवती (मिनर्वा मिल्स खटला, १९८०)

**१०. मतदानाचा अधिकार -**

सर्व भारतीयांना संविधानाच्या निर्मितीसोबत मतदानाचा आणि निवडणूका लढविण्याचा समान अधिकार मिळाला. मात्र इतर अनेक देशांमध्ये महिलांना किंवा विशिष्ट वंशाच्या नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळविण्यासाठी लढा द्यावा लागला.

अमेरिकेने १७८७ मध्ये त्यांची घटना स्वीकारली मात्र काळ्या वर्णाच्या पुरुष नागरीकांना मतदानाचा अधिकार १८७० मध्ये तर महिलांना मतदानाचा अधिकार १९२० मध्ये मिळाला.

ऑस्ट्रेलियाने संविधानाचा स्वीकार १९०१ मध्ये केला तरी तेथील मूळच्या आदिवासींना मतदानाचा अधिकार १९६२ मध्ये मिळाला.

फ्रान्सने १७९१ मध्ये पहिल्या घटनेचा स्वीकार केला तरी तेथील महिलांना मतदानाचा अधिकार १९४४ मध्ये मिळाला.

स्वित्झर्लंड मधील महिलांना राष्ट्रीय स्तरावर मतदानाचा अधिकार १९७१ मध्ये मिळाला.

न्यूझीलंड मधील महिलांना मतदानाचा अधिकार १८९३ मध्ये मिळाला तरी त्यांना निवडणूक लढविण्याचा अधिकार १९१९ मध्ये मिळाला.

सौदी अरेबियातील महिलांना मतदानाचा अधिकार अगदी अलीकडे २०१५ मध्ये मिळाला.

**११. २४ वी घटना दुरुस्ती - पार्श्वभूमी व पुढील घडामोडी -**

पंजाब सरकारने कमाल जमीन धारणेसंदर्भात केलेल्या कायद्यामुळे आपल्या मालमत्ता धारण करण्याच्या मूलभूत अधिकाराचे हनन झाल्याचा दावा करीत गोलकनाथ कुटुंबाने न्यायालयात धाव घेतली. १९६७ साली हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले असता, न्यायालयाने संबंधित कायदा रद्द करीत असा निर्णय दिला की, मूलभूत अधिकार हा संविधानाचा गाभा असून कोणताही कायदा अथवा घटना दुरुस्तीद्वारे त्यावर निर्बंध आणता येणार नाही. या निर्णयामुळे संसदेच्या संविधानात दुरुस्ती करण्याच्या अधिकारावर बंधने आली.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालास प्रत्युत्तर देत १९७१ मध्ये संसदेने २४वी घटनादुरुस्ती केली. अनुच्छेद ३६८ अन्वये संसदेला मूलभूत अधिकारांसह संविधानाच्या कोणत्याही भागात दुरुस्ती करण्याचे अधिकार असतील व त्यास अनुच्छेद १३ मधील व्याख्येनुसार मुलभूत अधिकारांस विसंगत कायदा समजले जाणार नाही, अशी तरतूद या घटना दुरुस्तीद्वारे करण्यात आली.

२४व्या घटना दुरुस्ती शिवाय २५व्या घटना दुरुस्तीद्वारे मालमत्तेच्या मूलभूत अधिकारावर निर्बंध आणण्यात आले व भौतिक साधनसंपत्तीचे योग्य वितरण व आर्थिक संसाधनांच्या केंद्रीकरणास प्रतिबंध या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी तयार करण्यात आलेल्या कायद्यांना आव्हान देता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली. तर २९व्या घटना दुरुस्तीद्वारे २० जमिन सुधारणा कायद्याचा नवव्या अनुसूचित सामावेश करुन त्यांना न्यायिक पुनरावलोकनापासून संरक्षण देण्यात आले.

केरळ मधील हिंदू मठाचे प्रमुख केशवानंद भारती यांनी २४, २५, व २९ व्या घटना दुरुस्तींविरोधात न्यायालयात दाद मागितली. १९७३ मध्ये १३ न्यायाधीशांच्या घटनापीठाने ७ विरुद्ध ६ अशा निसटत्या बहुमताने संसदेचा घटना दुरुस्तीचा अधिकार मान्य केला तरी संविधानाच्या मुलभूत ढाच्यात बदल करण्याचा संसदेला अधिकार नाही असा निर्णय दिला. यामुळे संसदेने केलेल्या घटना दुरुस्तींचे पुनरावलोकन करण्याचा वा रद्द करण्याचा न्यायसंस्थेचा अधिकार कायम अधोरेखित झाला.

निकालाच्या दुसऱ्याच दिवशी या निकालाच्या विरोधात मत नोंदविणाऱ्या घटनापीठाच्या सदस्य न्यायाधीशांपैकी न्या. अजित नाथ राय यांना इतर तीन न्यायाधीशांची सेवाज्येष्ठता डावलून इंदिरा गांधी सरकारने भारताचे मुख्य न्यायाधीश बनविले.

### १२. आणीबाणी - घटनाक्रम

१९७१ च्या युद्धानंतर महागाई, बेरोजगारी, अन्नधान्याचा तुटवडा व देशाच्या एकूणच बिकट आर्थिक स्थितीमुळे इंदिरा गांधी सरकार विरोधात जनमत बनू लागेल होते. सरकार विरोधात खुलेआम भ्रष्टाचाराचे आरोप होत होते. जे पी नारायण यांच्या नेतृत्त्वातील नवनिर्माण अभियानाने जनतेतील उद्वेगाला आवाज मिळवून दिला.

त्यातच इंदिरा गांधी यांच्या विरोधात निवडणूक हरलेल्या राज नारायण यांनी निवडणुकीमध्ये सरकारी यंत्रणेचा गैरवापर केल्याचा आरोप करीत अलाहाबाद उच्च

न्यायालयात इंदिरा गांधी यांच्या विरोधात दाखल केलेल्या खटल्यात न्यायालयाने निवडणूक निकाल रद्द ठरवित इंदिरा गांधी यांना पुढील ६ वर्षे निवडणुका लढविण्यास मज्जाव केला.

या निर्णयाविरोधात इंदिरा गांधींनी सर्वोच्च न्यायालयात अपील केले असता, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निकालाला आंशिक स्थगिती देत, इंदिरा गांधी यांना पंतप्रधान पदी राहण्याची परवानगी दिली तरी संसदेत कोणत्याही मतदानात सहभागी होण्यास मज्जाव केला.

या निकालाने बिथरलेल्या इंदिरा गांधी यांनी दुसऱ्याच दिवशी अंतर्गत बंडाळीचा बनाव करीत, अनुच्छेद ३५२ चा वापर करुन राष्ट्रपती श्री. फखरुद्दीन अली अहमद यांच्या माध्यमातून आणीबाणी जाहीर केली.

**१३. आणीबाणी आणि सामान्य नागरिक**

नागरिकांच्या भाषणाच्या, व्यक्त होण्याच्या, एकत्र जमण्याच्या, मुक्तपणे संचार करण्याच्या, देशातील कोणत्याही भागात वास्तव्य करण्याच्या अधिकारावर गदा आली.

कायद्यापुढे समानतेच्या, व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारांना नाकारले गेले.

नागरिकांना न्याय मिळविण्यासाठी न्यायालयात जाण्यास मज्जाव करण्यात आला.

अंतर्गत बंडाळीचे कारण पुढे करत विरोधी पक्षातील नेत्यांना Maintenance of Internal Security Act (MISA) कायद्याखाली अटक करण्यात आल्या.

साधारण ३५,००० लोकांना खटला न चालविता अटकेत ठेवण्यात आले.

संपादकांना बातम्या, संपादकीये, छायाचित्रे छापण्यापूर्वी सरकारची परवानगी घ्यावी लागत होती. रेडिओवरही असेच निर्बंध होते.

सुरुवातीच्या काळात दिल्लीतील वर्तमानपत्रांच्या कार्यालयांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला.

चित्रपटांवरही सेन्सॉर बोर्डाच्या माध्यमातून निर्बंध टाकण्यात आले.

आणीबाणी जाहीर करण्याच्या राष्ट्रपतींच्या निर्णयाला आव्हान देणारे खटले चालविण्यास न्यायालयांना मज्जाव करण्यात आला.

पंतप्रधान व लोकसभा अध्यक्षांच्या निवडणुका न्यायालयीन छाननीच्या कक्षेतून वगळण्यात आल्या.

४२व्या घटना दुरुस्तीद्वारे उच्च व सर्वोच्च न्यायालयांच्या अधिकारांवर निर्बंध आणले गेले. घटना दुरुस्त्यांचे पुनरावलोकन करण्यास न्यायालयांना मज्जाव करण्यात आला.

संसद व न्यायालयांचे प्रोसिडिंग्ज (कार्यवृत्त), नायालायांचे निकाल छापण्यापूर्वी संपादित केले जात.

दोन वर्षात १ कोटी ७ लाख लोकांवर नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आली. अविवाहित पुरुषांवर बळजबरीने शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यात १,७७४ जणांचा मृत्यू झाला. अनेक राज्यांमध्ये शस्त्रक्रियेस नकार देणाऱ्या कुटुंबांना रेशन, नोकरी, कर्ज व आरोग्य सेवा नाकारण्यात येत.

२५,९६२ शासकीय व सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना बळजबरीने मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेण्यास भाग पाडले.

https://www.pib.gov.in/FactsheetDetails.aspx?Id=149224

---------

# श्री. देवेंद्र फडणवीस यांची कारकीर्द

**जन्म दिनांक**

२२, जुलै १९७०

**शिक्षण**

* एलएलबी, नागपूर विद्यापीठ, १९९२
* व्यवसाय व्यवस्थापन, पदव्युत्तर पदवी
* प्रकल्प व्यवस्थापनाच्या पद्धती आणि तंत्रे, पदविका, डीएसई बर्लिन, जर्मनी

**प्रशासकीय पदे**

* नगरसेवक, नागपूर महानगरपालिका (१९९२-१९९७ आणि १९९७-२००१)
* महापौर, नागपूर महानगरपालिका, मेयर इन काऊन्सिल (१९९७-२००१)
* सदस्य, महाराष्ट्र विधानसभा (१९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९, २०१९-२०२४, २०२४ ते आतापर्यंत)
* मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (२०१४-२०१९)
* विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा (२०१९-२०२२)
* उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (२०२२-२०२४)
* मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (डिसेंबर २०२४ ते आतापर्यंत)

**संघटनात्मक पदे**

* प्रभाग निमंत्रक, १९८९
* पदाधिकारी, नागपूर पश्चिम, १९९०
* नागपूर शहर अध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा, १९९२
* राज्य उपाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा, १९९४
* राष्ट्रीय उपाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा, २००१
* सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश, २०१०
* अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश, २०१३
* प्रभारी, केरळ राज्य
* प्रभारी, बिहार राज्य निवडणूक, २०२०

* प्रभारी, गोवा राज्य निवडणूक, २०२१
* सदस्य, भाजपा केंद्रीय निवडणूक समिती, २०२२

**विधिमंडळ समित्यांवर निवड**

* अंदाज समिती
* नियम समिती
* सार्वजनिक उपक्रम समिती
* स्थायी समिती, नगरविकास आणि गृहनिर्माण
* राखीव निधी, संयुक्त निवड समिती
* स्वयं अर्थसहाय्यित शाळा, संयुक्त निवड समिती
* महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संयुक्त निवड समिती

**सामाजिक योगदान**

* नीती आयोग आयोजित 'शेतीतील परिवर्तन' या विषयावरील देशभरातील मुख्यमंत्र्यांच्या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्षपद (२०१९)
* सचिव, ग्लोबल पार्लियामेंटेरिअन्स फोरम ऑन हॅबिटॅट फॉर एशिया रिजन
* उपाध्यक्ष, सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नाशिक (भोसला मिलिटरी स्कूल)
* अध्यक्ष, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
* अध्यक्ष, नागपूर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन
* सिनेट सदस्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

**आंतरराष्ट्रीय सहभाग**

* अमेरिकेतील होनोलुलू येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय एनव्हायरनमेंट समिटमध्ये सहभाग (१९९९)
* अमेरिकेतील वॉशिंग्टन आणि नॅशविले येथील यू.एस. नॅशनल कॉन्फरन्स ऑफ स्टेट लेजिस्लेचर्समध्ये सहभाग (२००५)
* स्वित्झर्लंडमधील दावोस येथे आयडीआरसी-युनेस्को-डब्ल्यूसीडीआर यांनी आयोजित केलेल्या 'डिझास्टर मिटिगेशन अ‍ॅण्ड मॅनेजमेंट इन इंडिया' या विषयावरील आंतराष्ट्रीय शिखर परिषदेत सादरीकरण (२००६)

* चीनमधील बिजिंग येथे डब्ल्यूएमओ – ईएसएसपी यांनी आयोजित केलेल्या ग्लोबल एनव्हायरनमेंटल चेंज काँग्रेस समिटमध्ये 'नॅचरल डिझास्टर्स मिटिगेशन–इश्यूज ऑन इकॉलिजिकल अॅण्ड सोशल रिस्क' या विषयावर सादरीकरण (२००६)
* डेन्मार्कमधील कोपेनहेगेन येथे आशिया व युरोपमधील तरुण राजकीय नेत्यांच्या परिषदेत भारताचे प्रतिनिधीत्व (२००७)
* अमेरिकन फेडरल सरकारच्या ईस्ट – वेस्ट सेंटरतर्फे आयोजित न्यू जनरेशन सेमिनारमध्ये 'एनर्जी सिक्युरिटी इश्युज' विषयावर शोधनिबंध सादर (२००८)
* ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड आणि सिंगापूर येथे गेलेल्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या उच्चस्तरीय प्रतिनिधीमंडळाचे सदस्य (२००८)
* रशियामधील मॉस्को येथे भेट दिलेल्या इंडो रशिया चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिष्टमंडळाचे सदस्य (२०१०)
* युरोपमधील क्रोएशिया येथे 'ग्लोबल पार्लमेंटरियन फोरम ऑन हॅबिटॅट' मध्ये सहभाग (२०११)
* मलेशियामधील 'जीपीएच एशिया रिजनल समिट'मध्ये सहभाग (२०१२)
* केनियातील नैरोबी येथे 'युनायटेड नेशन्स हॅबिटॅट'ने निमंत्रित केलेल्या शिष्टमंडळात सहभागी (२०१२)

## आंतरराष्ट्रीय सन्मान

* ली कुआन यू एक्सचेंज फेलोशिप, ली कुआन यू स्कूल ऑफ पब्लिक पॉलिसी, सिंगापूर
* विकासकामांसाठी भरीव योगदान दिल्याबद्दल डेव्हलपमेंट पुरस्कार, जॉर्जटाऊन विद्यापीठ
* मानद डॉक्टरेट पदवी, ओसाका सिटी विद्यापीठ, जपान

## पुरस्कार

* बेस्ट पार्लियामेंटेरिअन अॅवॉर्ड, राष्ट्रकुल संसदीय मंडळ (२००२-०३)
* बिझनेस रिफॉर्मर ऑफ दी इयर, इकॉनॉमिक टाईम्स
* स्वर्गीय प्रमोदजी महाजन यांच्या स्मरणार्थ मुक्तचंद, पुणे तर्फे बेस्ट पार्लियामेंटेरिअन अॅवॉर्ड

* नाग भूषण फाऊंडेशनतर्फे नाग भूषण पुरस्कार (२०१६)
* नाशिकमधील पूर्णावड परिवारातर्फे राजयोगी नेता पुरस्कार
* उत्कृष्ट वक्ता पुरस्कार, राष्ट्रीय आंतर विद्यापीठ परिसंवाद
* हिंदू लॉ मध्ये बोस पुरस्कार
* मोस्ट चॅलेजिंग युथ रिजनल अ‍ॅवॉर्ड, रोटरी क्लब

**पुस्तके**

* अर्थसंकल्प सोप्या भाषेत, २०२०
* आत्मनिर्भर महाराष्ट्र - आत्मनिर्भर भारत, २०२० (इंग्रजी, हिंदी आणि मराठी)

**मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री कार्यकाळातील परदेश दौरे**

* वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, दावोस, स्वित्झर्लंड (जानेवारी २०१५, जानेवारी २०१८, जानेवारी २०२५)
* हॅनोव्हर मेस कॉन्फरन्स, जर्मनी (एप्रिल, २०१५)
* इस्त्रायल (एप्रिल, २०१५)
* चीन (मे, २०१५)
* अमेरिका (जुलै, २०१५, सप्टेंबर २०१६)
* जपान (सप्टेंबर, २०१५)
* लंडन (नोव्हेंबर, २०१५)
* रशिया (जुलै २०१६)
* दक्षिण कोरिया-सिंगापूर (सप्टेंबर, २०१७)
* स्वीडन एक्सपो, स्वीडन (ऑक्टोबर, २०१७)
* दुबई, कॅनडा, अमेरिका (जून २०१८)
* मॉस्को, रशिया (सप्टेंबर, २०२२)
* जपान सरकारचे विशेष निमंत्रण (ऑगस्ट २०२३)

---------






उद्घाटन समारोह
23RD JUNE, 2025
ADV. RAHUL NARWEKAR
DEVENDRA FADNAVIS
HON'BLE CHIEF MINISTER
OM BIRLA






WORLD ECONOMIC FORUM
MAGNETIC MAHARASHTRA
DAVOS


Presented by
Koyasan University, Japan
At The Hands of
Prof. INUI Ryunin
Koyasan University
高野山大学
KOYASAN UNIVERSITY


Avendus
MUMBAI

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई



संकलन आणि संपादनः
**महाराष्ट्र विधीमंडळ संचालित**, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र,
विधान भवन, मुंबई / नागपूर

संपूर्ण भाषणाच्या व्हिडिओसाठी कोड स्कॅन करा